सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. २८ मार्च २०२५ वर्ष दुसरे अंक ३६१ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## लोकसभेत स्थलांतर सुधारणा विधेयक संमत

### देशाच्या हद्दीत लोकांच्या येण्या-जाण्यावर आता राहणार लक्ष

नवी दिल्ली : देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी लोकसभेत इमिग्रेशन सुधारणा विधेयक सादर केले. या विधेयकानुसार भारतात येणाऱ्या प्रत्येक परदेशी प्रवाशांचे एक खाते तयार होणार आहे, याद्वारे त्या लोकांच्या येण्या-जाण्यावर लक्ष ठेवले जाणार आहे.

स्थलांतर हा एक वेगळा मुद्दा नाही. देशातील अनेक प्रश्न त्याच्याशी जोडलेले आहेत. आपल्या देशाच्या हद्दीत कोण येते? ते कधी येते? ते किती काळासाठी येते? आणि ते कोणत्या उद्देशाने येते? देशाच्या सुरक्षेसाठी हे जाणून घेण्याचा अधिकार खूप महत्त्वाचा आहे, असे सांगत देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी आज लोकसभेत स्थलांतर सुधारणा विधेयक सादर केले, ते संमतही करण्यात आले.

गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी लोकसभेत इमिग्रेशन सुधारणा विधेयक सादर केले. या विधेयकानुसार भारतात येणाऱ्या प्रत्येक परदेशी प्रवाशाचे एक खाते तयार होणार आहे, याद्वारे त्या लोकांच्या येण्या-जाण्यावर लक्ष ठेवले जाणार आहे. यामुळे भारतात येणाऱ्या लोकांचा डेटाबेस आपोआप तयार होणार आहे.



इमिग्रेशन आणि परदेशी लोकांबाबतचे विधेयक लोकसभेने मंजूर केले आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी या विधेयकावरील चर्चेला उत्तर दिल्यानंतर, विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सभागृह तहकूब करण्याची घोषणा केली.

घुसखोरीसाठी आलेल्यांवर कडक कारवाई

स्वातंत्र्याच्या वेळी देशाची फाळणी घाईघाईत झाली आणि हिंदू आणि शिखांनी भरलेल्या गाड्यांची कत्तल करण्यात आली. तेव्हा नेहरूजी आणि गांधीजींनी सांगितले होते की तुम्ही तिथेच राहा. जेव्हा ते येतील तेव्हा त्यांना भारताचे नागरिक मानले जाईल. जे लोक येथे आपला धर्म आणि कुटुंब वाचवण्यासाठी आले आहेत ते खरे निर्वासित आहेत. हिंदू, शीख, बौद्ध, जैन, कोणीही भारतात येऊ शकतो. तुमचे स्वागत आहे. घुसखोरी करण्यासाठी आलेल्यांवर आम्ही कडक कारवाई करू. फाळणीचे भयानक परिणाम सहन करणाऱ्यांनाच आम्ही नागरिकत्व देऊ, असे शहा यांनी म्हटले.

## झोजिला बोगद्याचे ७० टक्के काम पूर्ण- नितीन गडकरी



### आशियातील सर्वात मोठा बोगदा

जम्मू- काश्मिर : जम्मू-काश्मीरला लद्दाखशी जोडणाऱ्या आशियातील सर्वात लांब बोगद्याची ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. एकूण १३ किलोमीटर लांबीच्या या बोगद्याचे काम २०२६ पर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत दिली. दरम्यान, हिवाळ्यात बर्फवृष्टीमुळे लडाखचा उर्वरीत भारताशी संपर्क तुटू नये म्हणून हा बोगदा महत्वाचा ठरणार आहे.

हिवाळ्यात संपर्क तुटणार नाही

यासंदर्भात नितीन गडकरी म्हणाले की, लद्दाख, जम्मू आणि काश्मीर येथे हिवाळ्यात बर्फवृष्टी होत असते. बर्फ वृष्टीमुळे अनेकदा या भागाचा उर्वरीत देशाशी संपर्क तुटतो. त्यामुळेच लद्दाखला देशाच्या इतर भागांशी सर्व ऋतूंमध्ये जोडण्यासाठी झोजिला हा महत्वाचा प्रकल्प आहे. सुरुवातीला या बोगद्याचा खर्च १२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होणार असल्याचा अंदाज होता, मात्र तो आता केवळ ५५०० कोटी रुपयांमध्ये पूर्ण केला जाणार आहे. झोजिला बोगद्यामुळे श्रीनगर-लेह महामार्ग वर्षभर सुरू राहणार आहे. हिवाळ्यात हा महामार्ग बंद झाल्यामुळे सामान्य नागरिक आणि लष्कराला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो, मात्र बोगदा पूर्ण झाल्यानंतर हा प्रश्न सुटणार आहे.

३ तासांचा प्रवास फक्त २० मिनिटांत

या अत्याधुनिक प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी नितीन गडकरी यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनाही आमंत्रित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१८ मध्ये या बोगद्याची पायाभरणी केली होती. ७.५७ मीटर उंचीचा हा घोड्याच्या नालाच्या आकाराचा, दोन-लेन असलेला सिंगल-ट्यूब बोगदा आहे. तो हिमालयात झोजिला खिंडीखाली काश्मीरमधील गांदरबल आणि लडाखमधील द्रास (कारगिल) जिल्ह्याला जोडेल. सध्या झोजिला खिंड पार करण्यासाठी सुमारे तीन तास लागतात, मात्र हा बोगदा पूर्ण झाल्यावर प्रवासाचा वेळ फक्त २० मिनिटांवर येईल.

गडकरी म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरमध्ये २ लाख कोटी रुपयांची रस्त्यांची कामे सुरू आहेत. तसेच १०५ बोगद्यांचे बांधकाम सुरू आहे, ज्यामुळे प्रवास अधिक सुलभ होणार आहे.

ऑस्ट्रियन तंत्रज्ञानाचा वापर

हा प्रकल्प स्मार्ट बोगदा प्रणालीसह सुसज्ज असून, नवीन ऑस्ट्रियन बोगदा खोदण्याच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये उउढत, रेडिओ नियंत्रण, अखंडित वीजपुरवठा आणि व्हेंटिलेशन यांसारख्या सुविधा उपलब्ध असणार आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे या प्रकल्पात भारत सरकारच्या ५००० कोटींची बचत झाली आहे.

## बेकायदा बालेशाह पीर दर्ग्यावर २० मेपूर्वी कारवाई होणार

भाईंदर : भाईंदर पश्चिमेतील उत्तन येथील तारोडी डोंगरी परिसरात कांदळवन क्षेत्रात बांधलेल्या बेकायदा बालेशाह पीर दर्ग्याच्या (इरश्रशीहरह झळी ऊीसरह) मुद्द्याने जोर धरला आहे. ही जागा सरकारी मालकीची असून, त्यावर अनधिकृत बांधकाम करून अतिक्रमण करण्यात आले आहे. या प्रकरणी विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून लक्ष वेधण्यात आले. त्यावर महसूल मंत्री बावनकुळे यांनी महसूल विभाग आणि मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी एकत्रित कारवाई करत २० मेपूर्वी दर्गा हटविण्याचे आदेश दिले आहेत.




उत्तन परिसरात बालेशाह पीर दर्ग्याचे सुमारे ७ हजार चौरस फूट क्षेत्रफळावर अवैध बांधकाम करण्यात आले आहे. या अतिक्रमणाविरोधात ॲड. खुश खंडेलवाल यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. यापूर्वी त्यांनी महानगरपालिका, अपर तहसीलदार आणि जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडेही तक्रारी केल्या होत्या. मात्र, कारवाई न झाल्याने त्यांनी थेट न्यायालयात धाव घेतली.

भाजप आमदार निरंजन डावखरे यांनी विधानपरिषदेत हा मुद्दा मांडला. या जागेवर अतिक्रमण झाल्याचे तसेच वारंवार नोटिसा दिल्या तरीही ते वाढत असल्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांनी मान्य केले. २० मेपूर्वी या जागेवरील अतिक्रमण काढले जाईल, असे आश्वासन त्यांनी सभागृहात दिले.

यापूर्वी विधानसभेतही दर्ग्याच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. या जागेवर खारफुटी नष्ट करून बांधकाम केल्यामुळे पर्यावरणाला मोठे नुकसान होत असल्याचे भाजप पदाधिकारी रवी व्यास यांनी सांगितले. त्यांनी याप्रकरणी प्रशासनाकडे तक्रार दाखल केली असून, लवकरात लवकर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## गिरीश महाजनांना जळगावात दुखापत

जळगाव : वरणगाव येथील शहीद जवान अर्जुन लक्ष्मण बाविस्कर यांना मानवंदना देण्यासाठी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आज वरणगाव शहरात दाखल झाले. गिरीश महाजन शहीद जवान अर्जुन बाविस्कर यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी मिल्ट्रीच्या ट्रकमध्ये उंचावर जंप मारून चढले. मात्र ट्रकचा वरचा रॉड थेट गिरीश महाजन यांच्या



डोक्याला लागला. यामुळे गिरीश महाजन यांच्या डोक्याला दुखापत झाली. त्यामुळे महाजनांच्या डोक्यातून रक्तस्राव झाला. यावेळी गिरीश महाजन यांना क्षणभर चक्कर आले. त्याच स्थित मंत्री महाजन यांनी शहीद जवान अर्जुन बाविस्कर यांच्या पार्थिव देहाला पुष्पचक्र अर्पण केले आणि अभिवादन केले.मंत्री महाजन ट्रकवरून खाली उतरले. डोक्याचे रक्त थांबत नसल्याने उपचारासाठी उपस्थित माजी नगराध्यक्ष सुनील काळे, कामगार नेते मिलिंद मेढे, भाजप शहराध्यक्ष सुनील माळी शेख आखलाक यांनी आग्रह करून तातडीने हॉस्पिटलमध्ये नेले.

## महिंद्राने भारतीय टेबल द्राक्षांच्या निर्यातीला सुरुवात करत गाठला २० वर्षांचा टप्पा

नाशिक : महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडचा एक भाग आणि भारतातून टेबल द्राक्षे निर्यात करणाऱ्या आघाडीच्या कंपन्यांपैकी एक महिंद्रा अ‍ॅग्री सोल्युशन्स लिमिटेड (MASL) ने भारतीय द्राक्षांची जागतिक बाजारपेठेत निर्यात करण्याच्या कामामध्ये २० वर्षांचा महत्वपूर्ण टप्पा गाठल्याची घोषणा आज केली. २००५ मध्ये महिंद्राने युरोपला पहिल्यांदा द्राक्षांची निर्यात केली होती. आज (MASL) तर्फे उत्तर अमेरिका, युरोप, चीन, आग्नेय आशिया आणि इतर अनेक देशांमध्ये उच्चतम दर्जाची गुणवत्ता, सुरक्षा मानके आणि शाश्वत पद्धतींसह द्राक्षे पुरवली जातात.

(MASL) विविध प्रकारची उच्च दर्जाची द्राक्षे निर्यात करते. त्यामध्ये पांढरी बिनबियांची थॉमसन आणि सोनाका, लाल बिनबियांची फ्लेम आणि क्रिमसन तसेच काळी बिनबियांची जंबो आणि शरद द्राक्षे समाविष्ट आहेत. ही द्राक्षे 'Saboro' आणि 'Frukinz' या ब्रँडखाली उपलब्ध आहेत.

नाशिकमध्ये असलेल्या अत्याधुनिक द्राक्ष पॅक हाऊसच्या सहाय्याने (MASL) च्या द्राक्ष व्यवसायाला पाठबळ मिळत असून द्राक्षांच्या कापणीपश्चात व्यवस्थापनासाठी जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचा अवलंब केला जातो. २०१९ मध्ये उद्घाटन झालेल्या या पॅक हाऊसमध्ये उत्पादनाचा मागोवा घेणे सुनिश्चित करत पुरवठा साखळी दरम्यान पिकाचा ताजेपणा कायम ठेवत



संपूर्ण प्रक्रिया सुरक्षित करून द्राक्षांची निवड आणि पॅकिंग केले जाते.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ

(MASL) चा द्राक्ष व्यवसाय नाशिक, बारामती आणि सांगली येथील ५०० हून अधिक शेतकऱ्यांसोबत जवळून कार्य करतो. हा या क्षेत्रातील कृषी परिक्षेत्राचा महत्वपूर्ण भाग आहे. द्राक्ष उत्पादन आणि पिकांची काळजी यामध्ये शेतकऱ्यांना कौशल्य मार्गदर्शन पुरवत या शेतकऱ्यांकडून उच्च गुणवत्तेची टेबल द्राक्षे घेतली जातात. यामध्ये सिंचन आणि शेती पद्धतीत सुधारणा तसेच रासायनिक इनपुट व पाण्याचा कमी वापर यावर भर देण्यात येतो. त्यामुळे द्राक्ष शेतीशी संबंधित कार्बन फूटप्रिंट कमी होतो आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होते.

उत्पादनात ३ पट वाढ

(MASL) टेबल द्राक्षांचे उत्पादन आणि व्यवस्थापनाची प्रक्रिया नव्याने परिभाषित करत असतानाच, स्थानिक समुदायाच्या कल्याणासाठी रोजगार निर्मिती आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सक्रिय भूमिका बजावत आहे. च-डङ ने शेतकऱ्यांना त्यांच्या निर्यातयोग्य उत्पादनात ३ पट वाढ करण्यास सक्षम केले आहे (२.५ चढ प्रति एकर वरून ७.५ चढ प्रति एकरपर्यंत).

(MASL) २० वर्षांची वाटचाल

(MASL) च्या २० वर्षांच्या द्राक्ष निर्यातीच्या महत्वपूर्ण टप्प्याबाबत बोलताना च-डङ चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश रामचंद्रन म्हणाले, गेल्या २० वर्षांत आमच्या द्राक्ष व्यवसायाच्या माध्यमातून आम्ही साध्य केलेल्या गोष्टींचा (MASL) मध्ये आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. द्राक्षांसारख्या उच्च मूल्य असलेल्या फळ पिकाद्वारे शाश्वतरीत्या गुणवत्ता, उत्पादनक्षमता आणि शेतकऱ्यांचा नफा वाढवण्याचे ध्येय आम्ही निश्चित केले होते. ही २० वर्षांची वाटचाल संपूर्ण कृषी मूल्यसाखळीच्या परिवर्तनासाठी दिलेल्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. आमच्या प्रयत्नांचा परिणाम भारतीय टेबल द्राक्षांचे उत्पादन आणि भारतातून जगातील इतर भागांमध्ये निर्यात करण्याच्या पद्धतीत झालेल्या लक्षणीय सुधारणांमध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे. तसेच या प्रदेशातील हजारो लोकांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पाडणे आम्हाला शक्य झाले याबद्दल आम्हाला धन्यता वाटत आहे.

रमेश पुढे म्हणाले, अत्याधुनिक पद्धतीने निवड, पॅकिंग आणि साठवणूक सुविधांसह, आमचे नाशिकमधील द्राक्ष पॅकहाऊस उद्योगासाठी नवीन मापदंड प्रस्थापित करत आहे. प्रत्येक टेबल द्राक्ष जागतिक ग्राहकांच्या कठोर निकषांना खरे उतरेल हे सुनिश्चित करत ही सुविधा उच्च दर्जाची गुणवत्ता, चव आणि ट्रेसिबिलिटी राखण्यासाठीच्या प्रणालीबद्ध पद्धतीसाठी प्रसिद्ध आहे.

७५,००० चौरस फूट क्षेत्रफळ व्यापणारे महिंद्रा द्राक्ष पॅकहाऊस ६.५ एकर जमिनीवर वसलेले आहे आणि प्रतिदिन ८० मेट्रिक टन (MT) द्राक्षांचे पॅकिंग करण्याची क्षमता आहे. या पॅकहाऊसमध्ये १२ प्रीकूलिंग चेंबर्स आणि १७० मेट्रिक टन (MT) प्रत्येकी क्षमता असलेली थंड हवेत साठवण करण्याच्या २ कोल्ड स्टोरेज फॅसीलिटी आहेत. यामुळे द्राक्षांचा ताजेपणा टिकून राहतो. प्रति शिफ्ट ५०० हून अधिक कर्मचाऱ्यांना रोजगार देणाऱ्या या द्राक्ष पॅकहाऊसच्या सर्व प्रक्रिया (MASL) च्या प्रशिक्षित अधिकाऱ्यांकडून व्यावसायिक पद्धतीने व्यवस्थापित आणि नियंत्रित केल्या जातात.



## एएलडी किंवा अल्कोहोलिक लिव्हर डिसीज म्हणजे काय?

नाशिक – अल्कोहोलिक लिव्हर डिसीज म्हणजे जास्त मद्यपान केल्यामुळे होणाऱ्या यकृताच्या आजारांचा एक गट. मी एक यकृत प्रत्यारोपण सर्जन आहे आणि मी वारंवार अशा रुग्णांना भेटतो ज्यांच्या आयुष्यावर एएलडी चा गंभीर परिणाम झाला आहे. जर ते लवकर आढळले तर ते रोखता येते आणि बरे करता येते. परंतु जर रोग वाढत गेला तर तो कधीही भरून न येणारे नुकसान करू शकतो आणि यकृत प्रत्यारोपणाची आवश्यकता असू शकते. सल्लामसलत करण्यासाठी, डॉ. स्वप्नील शर्मा, सल्लागार यकृत प्रत्यारोपण, एचपीबी आणि जीआय सर्जन, वोकहार्ट हॉस्पिटल्स आता रायपूरमध्ये उपलब्ध आहेत.

## इनड्राइव्हने ड्रायव्हर ऑफ द मंथ उपक्रम सुरू केला

मुंबई : जागतिक गतिशीलता आणि शहरी सेवा प्लॅटफॉर्म इनड्राइव्हने दिल्ली, कोलकाता आणि मुंबई येथे ड्रायव्हर ऑफ द मंथ उपक्रम सुरू केला आहे. हा उपक्रम १ मार्च ते ३१ मार्च पर्यंत चालेल आणि त्याचा उद्देश ड्रायव्हर-पार्टनरना अधिकाधिक प्रवास करण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि बक्षीस देणे आहे. महिनाभर चालणाऱ्या या उपक्रमांतर्गत, कॅब, मोटो आणि ऑटो रिक्षाच्या प्रत्येक श्रेणीमध्ये कोलकाता, मुंबई आणि दिल्ली येथील प्रत्येकी तीन विजेते निवडले जातील. याशिवाय, प्रत्येक शहरात प्रत्येक श्रेणीत १५ सांत्वन बक्षिसे देखील दिली जातील.

इनड्राइव्हचे भारत येथील कंट्री मॅनेजर प्रतीप मजुमदार म्हणाले, इनड्राइव्हमध्ये उत्तम सेवा देण्यासाठी आमच्या ड्रायव्हर-पार्टनर्सचे योगदान महत्त्वाचे आहे. हा उपक्रम आमच्या ड्रायव्हर-पार्टनर्सच्या कठोर परिश्रमाची दखल घेण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा एक भाग आहे. यामुळे त्यांना अधिक राइड्स घेण्यास आणि त्यांच्या कमाईत वाढ करण्यास प्रोत्साहन मिळेल. ते पुढे म्हणाले, आम्ही एक लोककेंद्रित कंपनी आहोत, परवडणारे भाडे आणि कमी सेवा शुल्क हे आमचे वैशिष्ट्य आहे. मुंबई आमच्या व्यवसाय आणि कामकाजासाठी एक मजबूत आणि महत्त्वाची बाजारपेठ आहे आणि येथे आम्हाला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद आहे. आमची साधी व्यवसाय पायाभूत सुविधा आम्हाला कमी शुल्काचे मॉडेल राखण्यास मदत करते, ज्यामुळे पारदर्शकता वाढते आणि उच्च कमिशन आणि अनपेक्षित भाडे वाढीची आवश्यकता कमी होते.

## परंपरा आणि आकर्षकतेचे संयोजन

छत्रपती संभाजीनगर – भारतातील आघाडीचा डायमंड ज्वेलरी ब्रँड ओरा ग्राहकांमध्ये लोकप्रिय आहे. ट्रेन्ड्स कायम ठेवण्यासोबत ग्राहकांच्या मागण्यांची पूर्तता होण्याची खात्री घेण्यासाठी ब्रँडने गुढीपाडव्याकरिता आकर्षक डिझाइन्सचे अनावरण केले, ज्यामध्ये परंपरा आणि समकालीन आकर्षकतेचे उत्तम संयोजन आहे. यंदा सणासुदीच्या काळात ओरा उत्सवी पेहरावांमध्ये अधिक आकर्षकतेची भर करण्यासाठी समकालीन डिझाइन्स सादर करत आहे. या नवीन उत्सवामध्ये लक्षवेधक हिरेजडित मंगळसूत्र आहे, जे पैठणी व नऊवारी साड्यांवर शोभून दिसण्यासाठी बारकाईने डिझाइन करण्यात आले आहे. या मास्टरपीसला पूरक मॅचिंग इअररिंग्स, आकर्षक अंगठी आणि आकर्षक ब्रेसलेटचे संयोजन आहे. प्रत्येक पीस उत्सवी उत्साहामध्ये अधिक आनंदाची भर करण्यासाठी विचारपूर्वक डिझाइन करण्यात आला आहे. या नवीन फेस्टिव्ह डिझाइन्समध्ये कालातीत परंपरा आणि आधुनिक कलाकृतीचे परिपूर्ण संतुलन आहे.

## ३००० हून अधिक शालेय विद्यार्थी आणि शिक्षकांना रस्ते सुरक्षा शिक्षणाने सशक्त

नाशिक : होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडिया ने नाशिक, महाराष्ट्र येथे रस्ते सुरक्षा जनजागृती मोहीम राबवून सुरक्षित वाहतुकीसाठी आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली. या उपक्रमाद्वारे न्यू इंग्लिश स्कूल, के. के. वाघ सीनियर कॉलेज आणि डॉ. बळीराम हिरे ट्रायबल स्कूलमधील ३००० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांना जबाबदार रस्ते वर्तनासंबंधी आवश्यक ज्ञान प्रदान करण्यात आले. प्रारंभिक टप्प्यातील रस्ते सुरक्षा शिक्षणावर भर देत, एचएमएसआय ने या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ जनजागृती नव्हे, तर दीर्घकालीन वर्तनात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला. लहान वयातच योग्य रस्ते सुरक्षा शिक्षण दिल्यास, हे विद्यार्थी भविष्यात जबाबदार वाहतूकदार बनण्यास मदत करतात आणि आपल्या परिसरावर सकारात्मक प्रभाव टाकतात.

## विवो ने त्यांच्या वाई सीरीज लाइनअपचा विस्तार केला

पुणे – जागतिक स्तरावरील नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड असलेल्या विवोने आज त्यांच्या वाय सीरीज लाइनअपमध्ये एक नाविन्यपूर्ण नवीन भर असलेला विवो वाय३९ लाँच केला. या स्मार्टफोनमध्ये प्रीमियम डिझाइनसह स्टायलिश आणि परिष्कृत ग्लेझ्ड सिरेमिकसारखे कॅमेरा मॉड्यूल आणि डायनॅमिक लाइटिंग इफेक्ट्स आहेत जे त्याच्या मजबूत बांधणीत भर घालतात. विवो वाई३९ त्याच्या श्रेणीतील सर्वोत्तम, अल्ट्रा-थिन ६,५००एमएएच बॅटरीसह एक अद्भुत अनुभव देते, जी ब्लूव्होल्ट तंत्रज्ञानाद्वारे समर्थित आहे, जी पाच वर्षांपर्यंत बॅटरी आयुष्य सुनिश्चित करते. या स्मार्टफोनमध्ये मिलिटरी-ग्रेड सर्टिफाइड१४ टिकाऊपणा, शील्ड ग्लास प्रोटेक्शन, रॉक-सॉलिड बॉडी आणि एसजीएस सर्टिफिकेशन आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः १९३/२०२५ पुता ३०/०४/२०२५

अर्जदार :-१- हेमलता भ्र. विजय पाटील. (हेमलता पिता जनार्धन बच्छाव) वय ५० वर्षे, धंदा नौकरी. रा. विवेकानंद कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २-प्रणव पिता विजय पाटील, वय २५ वर्षे, धंदा शती, रा. विवेकानंद कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३-आर्यन पिता विजय पाटील, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. जन्मदाती आई अर्जदार क्र. १

विरुध्द

गैरअर्जदार :-महाराष्ट्र शासन, मार्फत – जिल्हाधिकारी औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद

अर्ज : कायदेशीर वारस प्रमाण पत्र (लिगल हे अरशिप सर्टीफिकेट) मिळणे बाबत. THE BOMBAY REGULATION VIII, 1827, SEC.2)

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ व्ही. के. माहिते यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी आहे. अर्जदार क्र. १ चे सासरे व अर्जदार क्र. २ व ३ यांचे आजोबा नामे एकनाथ शामराव पवार हे दिनांक १७/०३/२००८ रोजी मौजे टाकळी ता. चाळीसगांव, जिल्हा जळगांव येथे मयत झालेल्या आहेत, तसेच अर्जदार क्रमांक १ ची सासु व अर्जदार क्रमांक २ व ३ यांची आजी नामे लिलाबाई एकनाथ पवार या दिनांक ०९/०१/२०१३ रोजी मयत झालेल्या आहेत, तसेच अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्रमांक २ व ३ यांचे वडील नामे विजय एकनाथ पाटील हे दिनांक ०६/०१/२०२५ रोजी मोजे औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत विजय एकनाथ पाटील यांचे वारस आहे, अर्जदारांशिवाय ईतर कुणीही कायदेशीर वारस मयतास नाही.

अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच जी.पी.एफ. व पेंन्शन कार्यालयात नोंद करणे कामी, महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार हे मागणी करीत आहे. सबब अर्जास कारण ०५/०३/२०२५ रोजी घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक २१/०३/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यीयालय क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क. २८८/२०२५

अर्जदार : १) विश्वास संभाजी जिवरख, वय ६९ वर्षे, धंदा. शेती, रा. नेवरगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) सुमन भ्र. आप्पासाहेब पठारे, वय ७३ वर्षे, धंदा. घरकाम, रा. भोकर ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर ३) बेबीताई भ्र. रावसाहेब पवार, वय. ७१ वर्षे, धंदा. घरकाम, रा. चेंडुफळ ता. वैजापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, संभाजी शिवाजी जिवरख हे नेवरगांव ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. २३/११/२००८ रोजी नेवरगांव ता. गंगापूर येथे मयत झाले असून त्यांच्यापुर्वी त्यांच्या पत्नी नामे पार्वताबाई संभाजी जिवरख हया दि. १६/०६/२००३ रोजी मरण पावले आहेत. मयत संभाजी शिवाजी जिवरख व पार्वताबाई संभाजी जिवरख यांची अर्जदार क. २ व ३ हे विवाहीत मुली असून अर्जदार क. १ हा मुलगा आहेत. मयतांना अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत संभाजी शिवाजी जिवरख व पार्वताबाई संभाजी जिवरख यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायलयात अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्कयानिशी दिले आहे.

सहायक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर

गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. १२१/२०२५

पु.ता. ०४/०४/२०२५

अर्जदार : जाईबाई रायभान सुखधान, वय ७५ वर्षे, धंदा, मजुरी, रा. अगरवाडगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदाराचे पती नामे रायभान केशवराव सुखधान हे मौजे अगरवाडगांव ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. ०१/०१/२०२२ रोजी उपचारादरम्याण शासकीय वैद्यकिय रूग्णालय घाटी औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत. मयत रायभान केशवराव सुखधान यांना हयात असतांना दोन बायका होत्या त्यापैकी पहिली पत्नी नामे राजाबाई रायभान सुखधान ही दि. ३१/०५/२०१९ रोजी मौजे अगरवाडगांव ता. गंगापूर येथे मयत झालेली आहे व मयत राजाबाई रायभान सुखधान व मयत रायभान केशवराव सुखधान यांना वैवाहीक संबधातुन कोणतेही आपत्य झालेले नाही. तसेच अर्जदार ही मयत रायभान केशवराव सुखधान यांची दुसरी पत्नी असून त्यांना वैवाहीक संबंधातुन कोणतेही आपत्य झालेले नाही. अर्जदार ही वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे रायभान केशवराव सुखधान यांना अर्जदार ही एकमेव कायदेशीर वारसदार असून अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार हीच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारास शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे..

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : २५/०३/२०२५

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी व फौजदारी न्यायालय,

गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही.डी.पाटील, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः १७५/२०२५ पु. ता. : २५/०४/२०२५

अर्जदार : १- बद्रीनाथ तेजपाल भोमावत, वय ८३ वर्षे, धंदा शेती व व्यापार, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ह. मु. चिंचोली पाठक, मालाड, वेस्ट मुंबई २-रंजना सुनिल भोमावत, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ह.मु. चिंचोली पाठक, मालाड, वेस्ट मुंबई ३-विरज सुनिल भोमावत, वय २९ वर्षे, धंदा नौकरी, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ह.मु. चिंचोली पाठक, मालाड, वेस्ट मुंबई ४-जय सुनिल भोमावत, वय २५ वर्षे, धंदा व्यापार, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ह.मु. चिंचोली पाठक, मालाड, वेस्ट मुंबई

– विरुध्द –

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर

प्रकरण : कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत. (Bombay Regulation Act VIII 1827, SEC.2)

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड., एम.एम. भारुका, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार १ चा मुलगा व अर्जदार २ चे पती व अर्जदार ३ व ४ चे वडील नामे सुनिल बद्रीनाथ भोमावत यांचा दिनांक १०.०२.२०२२ रोजी अर्जदार २ ते ४ यांच्या घरी मुंबई येथे मृत्यु झालेला असून त्यांच्या पश्चात अर्जदार १ ते ४ हेच केवळ वारस असून अर्जदारां व्यतीरिक्त मयतास ईतर कोणतेही वारस नाही. मयताची आई कंचनदेवी बद्रीनारायण भोमावत यांचा देखील दिनांक २३.०५.२०२३ रोजी मृत्यु झालेला आहे. अर्जदार क्रमांक १ यांचा मयत मुलगा नामे सुनील बद्रीनाथ भोमावत मृत्युपूर्वी अंधानेर ता. कन्नड येथिल कायमचा रहिवाशी असून अंधानेर शिवारातील जमीन गट क्रमांक ४६५ जमीनीची मेहनत मशागत करुन शेती करत होते. अर्जदारास वरील प्रमाणे मयत सुनिल भोमावत यांच्या मृत्यु पश्चात वारसा हक्काने मिळणारे सर्व हक्क व अधिकार तसेच शासकीय व निमशासकीय फायदे व अभिलेखात नोंदी घेण्या करीता वारस प्रमाण पत्र आवश्यक आहे. सदरील शासकीय कामकाजात सक्षम न्यायालयाच्या वारसा प्रमाण पत्रा शिवाय अर्जदाराचे हक्क व अधिकार बजावण्या करीता अडचण निर्माण झालेली असल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास दिनांक ०१/०१/२०२५ रोजी कारण घडले आहे. अर्जदाराचा मुलगा / पती/ वडील सुनिल भोमावत मृत्यु पुर्वी अर्जदार १ सोबत अंधानेर ता. कन्नड येथिल कायमचा रहिवाशी असल्यामूळे मा. न्यायालयास सदरचा अर्ज निकाली काढण्याचा संपूर्ण अधिकार आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २१.०३.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक – २१/०३/२०२५

आदेशावरुन

क लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ. अर्ज.क्रं.१९१/२०२५ पुढील तारीख १७/०४/२०२५

अर्जदार : १- कड़बाई भ्र. जयाजी खडके, वय ८४ वर्ष, धंदा घरकाम, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २- प्रकाश पिता जयाजी खडके, वय ७२ वर्ष, धंदा शेती. रा. दिगर. पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३- राजू पिता जयाजी खडके, (मयत दि. ०४/१२/२००८ चे वारस) ३.१-रंजना भ्र. राजू खडके, वय- ४७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३.२- अभिजित पिता राजू खडके, वय- २४ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३.३- जितेश पिता राजू खडके, वय- १९ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३.४- जयश्री भ्र.अतूल नवले, वय-२२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४- सुमित्राबाई उर्फ नंदाबाई सुर्यभान नवले, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५- संगिता भ्र. सुर्यकांत मोकासे, वय- ४८ वर्षे, धंदा- घरकाम, रा. पिशोर, शंफेपुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय छ. संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु.ए. वारे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत जयाजी पांडूरंग खडके यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ५ हे मुले व मुली आहे. मयत जयाजी पांडूरंग खडके हे दिनांक २७/०५/२००४ रोजी मौजे पिशोर ता. कन्नड येथे मरण पावले आहे. सोबत मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे.

मयत जयाजी पांडूरंग खडके यांना अर्जदार क्र. २ ते ५ अशी एकूण ४ आपत्य होती. त्यापैकी अर्जदार क्र. ३ राजू जयाजी खडके हा दि. ०४/१२/२००८ रोजी मौजे दिगर (पिशोर) ता. कन्नड येथे मयत झाला असून त्यांना अर्जदार क्र. ३.१ ही पत्नी असून अर्जदार क्र. ३.२ व ३.४ या मुली-मुले आहे.

अर्जदार क्रं. १ ते ५ यांना मयत जयाजी पांडूरंग खडके यांचे मृत्यू पश्चात प्रकल्प ग्रस्त योजनांचा लाभतसेच तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, महसूल दप्तरी, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक २०/०३/२०२५

आदेशावरुन

क लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय.आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज. क्र. १९७/२०२५

पुढीत तारीख ०२/०४/२०२५

अर्जदार : १- इंदूबाई भ्र. भाऊराव पाटील, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवनगर, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २- दत्ता पि. भाऊराव पाटील, वय ४४ वर्षे, धंदा नौकरी, रा. शिवनगर, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद, ३ ह.मु. ज्योतिबा नगर, काळेवाडी, पुणे ता. व जि. पुणे ३- कल्पना दत्तात्रय निकम, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. ज्योतिबा नगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे ता.जि. पुणे ४- बबिता विजय पाटील, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम, रा. ज्योतिबा नगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे ता. व जि. पुणे

-विरुद्ध-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस (Legal Heirship Certificate) प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस.एन. उपासणी यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत भाऊराव संपत पाटील यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र. ३ व ४ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. अर्जदार क्र. २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ही त्याची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत भाऊराव संपत पाटील यांचे कायदेशीर वारस आहे. या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे भाऊराव संपत पाटील हे दि.१८/११/२०१८ रोजी मौजे कन्नड येथे मरण पावले आहे. सोबत मयत भाऊराव संपत पाटील यांचे नगर परिषद कन्नड यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे.

अर्जदार क्र. १ ते ४ यांना मयत भाऊराव संपत पाटील यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन,

दिनांक २६/३/२०२५

आदेशावरून

क. लीपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय.आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.क्रि. अर्ज.क्रं. १५५/२०२५

पुढील तारीख ११/०४/२०२५

अर्जदार : १- कृष्णा पिता पोमा राठोड, वय ६० वर्षे, धंदा मजुरी, रा. भारंवा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २- संतोष पिता कृष्णा राठोड, वय ४२ वर्षे, धंदा मजुरी, रा. भारंवा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३- शिवाजी पिता कृष्णा राठोड, वय ३६ वर्षे, धंदा मजुरी, रा. भारंवा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४- संगिता भ्र. रावसाहेब चव्हाण, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. माळदतांडा, ता. खुल्ताबाद जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गेरअर्जदार :-महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस.एन. उपासणी यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ हे मयत मिराबाई भ्र. कृष्णा राठोड यांचा पती असून अर्जदार क्र. २ व ३ हे मुले असून अर्जदार क्र. ४ ही मुलगी आहे. अर्जदार क्र. २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ हे त्यांचे वडील आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत मिराबाई भ्र. कृष्णा राठोड यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ च्या पत्नी व अर्जदार क्र. २ ते ४ यांची आई नामे मिराबाई भ्र. कृष्णा राठोड हया दि. २४/०४/२०१७ रोजी मोजे भारंबा येथे मरण पावली आहे. सोबत मयत मिराबाई भ्र. कृष्णा राठोड यांचे ग्रामपंचायत भारंबा यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे.

अर्जदार क्र. १ ते ४ यांना मयत मिराबाई भ्र. कृष्णा राठोड यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि. २३/०१/२०२५ रोजी मौजे भारंबा ता. कन्नड येथे घडले.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन. दिनांक २६/०२/२०२५

आदेशावरून

क. लीपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.मु.नं. १८०/२०२५.

पुढील तारीख २२/०४/२०२५०

अर्जदार : १. संजय जगन राठोड, वय – ४४ वर्षे, धंदा- शेती, रा. जैतखेडा (तांडा) ता. कन्नड जि. औरंगाबाद २. ताराचंद जगन राठोड, वय- ४६ वर्षे, धंदा- शेती, रा. जैतखेडा (तांडा) ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. रमेश जगन राठोड, वय – ४९ वर्षे, धंदा- शेती, रा. जैतखेडा (तांडा) ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. कोमल विजय चव्हाण, वय – ४३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. राहाळ पट्टी तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद ५. निलाबाई हरी जाधव, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. जेहुर ता. कन्नड जि. औरंगाबाद ६. नांदीबाई भ्र. जगन राठोड, वय ६३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. जैतखेडा (तांडा) ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डी. एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार ही वरील ठिकाणची रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ते ५ हे आपसा सख्खे भाऊ बहीन असुन अर्जदार क्र. ६, ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत काळु रेवा राठोड यांचे नातवंडे असुन व अर्जदार क्र. ६ ही मयत काळु रेवा राठोड यांची सुन आहेत. मयत काळु रेवा राठोड हे दिनांक २७/०१/२००८ रोजी मयत झालेला आहे व त्यांना अर्जदार हे वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडील व अर्जदार क्र. ६ हिचे पती नामे जगन काळु राठोड हे देखील दिनांक २०/०७/२०२२ रोजी मौजे जैतखेडा तांडा ता. कन्नड येथे मयत झाले असुन ते मयत काळु रेवा राठोड यांचा मुलगा होता त्यांना सुद्धा अर्जदार हेच वारस आहे. अर्जदार यांना मयत कालु रेवा राठोड यांचे वारस प्रमाणत्र हे शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी तसेच तलाठी कार्यालयात, महसुल अधिकारी व तहसिल कार्यालय येथे मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी तसेच मयताच्या नावे मौजे जैतखेडा तांडा शिवारातील शेत जमीन धरणात संपादीत झालेली असुन धरणग्रस्त प्रमाणपत्र काढण्यासाठी वारस प्रमाणपत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. वरील अधिकाऱ्यांनी मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केल्याने सदरील अर्ज करण्यास कारण घडले आहे. सदरील वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही, किंवा वारस प्रमाणात्र घेतलेले नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणताही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायलयात स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप दाखल करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

दि.२५/०३/२०२५.

आदेशावरून

क लिपिक — सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा व्हि एन ण काटकर दिवाणी न्यायाधीश क स्तर कन्नड यांचे न्यायालयात**

दि की अर्ज क्र १२६ / २०२५

पु ता. १/४/२५

अर्जदार : १. रुखमनबाई भागू डहाके वय ७६ वर्षे धंदा शेती रा शफेपूर त कन्नड जी औरंगाबाद २. अण्णा भागजी डहाके वय ५५ वर्षे धंदा शेती रा शफेपूर त कन्नड जी औरंगाबाद ३. विठ्ठल भागजी डहाके वय ४१ वर्षे धंदा शेती रा. शफेपूर त कन्नड जी औरंगाबाद ४. सुनील भागजी डहाके वय २७ वर्षे धंदा शेती रा शफेपूर त कन्नड जी औरंगाबाद ५. संगीता भ नाना सावलकर वय ५० वर्षे धंदा शेती रा ता पाचोरा जळगाव ६. आलकाबाई भ चिंतामण मोकासे वय ४५ वर्षे धंदा शेती रा करंजखेडा ता कन्नड औरंगाबाद ७. शोभा भ संजय वय ५० वर्षे धंदा शेती रा रा जिरेमली ता चाळीसगाव

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी औरंगाबाद

अर्ज अर्जदार १ ते ७ है मयत ठकुजी तान्हजी डहाके यांचे कायदेशीर वारस प्रमापत्र मिळणे बाबत ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधज्ञ अड डी एफ म्हस्के यांच्या मार्फत मा न्यायालयात अर्ज सादर केला आहे की अर्जदार १ ही मयत ठकुजी तान्हजी डहाके यांची सून आहे व अर्जदार २ त ४ हे मयत ठकुजी तान्हजी डहाके यांचे नातू आहे व अर्जदार क्र ५ ही मुलगी आहे आणि अर्जदार क्र ६ व ७ या नाती आहे मयत मयत ठकुजी तान्हजी डहाके हे दि ८/४/१९९२ रोजी मयत जा असून त्यांचा अंतसंस्कार शफेपूर पिशोर ता कन्नड येथे करण्यात आला आहे मयत ठकुजी तान्हजी डहाके यांना अर्जदार १ ते ७ शिवाय इतर कुणीही वारस नाही त्याच प्रमाणे मयत ठकुजी तान्हजी डहाके यांचा मुलगा नामे भागू ठकु डहाके हे देखील दि ६/९/२००७ रोजी मयत झाले आहे ते अर्जदार १ यांचे पती असून २ ते ७ यांचे वडील आहे त्यांना देखील अर्जदार हेच वारस आहे मयत मयत ठकुजी तान्हजी डहाके यांना मिळणाऱ्या शासकीय निमशाकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी तसेच धरण ग्रस्त प्रमाणपत्र मिळने कामी सादर वारस पत्राची गरज आहे प्रमाण सादर अधिकारी यांनी न्यायलयातून वारस प्रमानपत्र आण्याचे संगीतल्याने अरजास कारण डी १/२/२०२५ रोजी घडले

त्या अर्थी सदर जाहिरप्रगटं द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्याबतबाबत जाचा कुणाचा ही काही उजेर आक्षेप असल्यास ३० दिवसाचे अंत आपला उजेर आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदाराचे नवे वारस प्रमाण पत्र देण्यात येईल त्या नंतर उजेर आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी

आदेशावरून

कः लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए.आय.आवटी, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : १७३/२०२५ पु. ता. : १९/०४/२०२५

अर्जदार : १-बद्रीनाथ तेजपाल भोमावत, वय ८३ वर्षे, धंदा शेती व व्यापार, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ह.मु. चिंचोली पाठक, मालाड, वेस्ट मुंबई २-अनिल बद्रीनाथ भोमावत, वय ५४ वर्षे, धंदा शेती व व्यापार, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगरह. मु. चिंचोली पाठक, मालाड, वेस्ट मुंबई ३-रंजना सुनिल भोमावत, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ह.मु. चिंचोली पाठक, मालाड, वेस्ट मुंबई ४ विरज सुनिल भोमावत, वय २९ वर्षे, धंदा नौकरी, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ह.मु. चिंचोली पाठक, मालाड, वेस्ट मुंबई ५. जय सुनिल भोमावत, वय २५ वर्षे, धंदा व्यापार, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ह.मु. चिंचोली पाठक, मालाड, वेस्ट मुंबई ६. रेखा शरद बन्सल, वय ६० वर्षे, धंदा वैदयकीय, रा. बन्सल हॉस्पीटल, एन-५/एम-२४ सिडको, छ. संभाजीनगर जिल्हा छ. संभाजीनगर ७-अनिता सुनिल अग्रवाल, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. मालेगांव रोड, धुळे, जिल्हा धुळे

– विरुध्द –

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर

अर्ज : कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड., एम.एम. भारुका, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार १ ची पत्नी व अर्जदार २,६,७ यांची आई तसेच अर्जदार ३ यांची सासु व अर्जदार ४ व ५ यांची आजी नामे कंचनदेवी बद्रीनाथ भोमावत यांचा दिनांक २३.५.२०२३ रोजी त्यांचा मुलगा अर्जदार ३ ते ५ यांच्या घरी मुंबई येथे मृत्यु झालेला असून त्यांच्या पश्चात अर्जदार १ ते ७ हेच केवळ वारस असून अर्जदारां व्यतीरिक्त मयतास ईतर कोणतेही वारस नाही. मयताचा मुलगा सुनिल बद्रीनाथ भोमावत यांचा देखील दिनांक १०.०२.२०२२ रोजी मृत्यु झालेला असून त्यास अर्जदार ३ ते ५ हेच वारस आहेत, अर्जदार क्रमांक १ त्यांची मयत पत्नी नामे कंचनदेवी बद्रीनाथ भोमावत मृत्युपूर्वी अंधानेर ता. कन्नड येथिल कायमची रहिवाशी असून अंधानेर शिवारातील जमीन गट क्रमांक १९२ जमीनीची मेहनत मशागत करुन शेती करत होतेव अर्जदार क्रमांक २ हे व्यवसायानिमीत्त मालाड मुंबई येथे राहत असून अर्जदार ६ व ७लग्नानंतर त्यांच्या सासरी वरील पत्यावर राहतात. अर्जदारास वरील प्रमाणे मयत कंचनदेवी यांच्या मृत्यु पश्चात वारसा हक्काने मिळणारे सर्व हक्क व अधिकार तसेच शासकीय व निमशासकीय फायदे व अभिलेखात नोंदी घेण्या करीता वारस प्रमाण पत्र आवश्यक आहे. सदरील शासकीय कामकाजात सक्षम न्यायालयाच्या वारसा प्रमाण पत्रा शिवाय अर्जदाराचे हक्क व अधिकार बजावण्या करीता अडचण निर्माण झालेली लेली असल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास दिनांक १२/१२/२०२४ रोजी कारण घडले आहे. अर्जदाराची पत्नी / आई / सासु / आजी कंचनदेवी भोमावत मृत्यु पुर्वी अर्जदार १ सोबत अंधानेर ताः कॅनड येथिल कायमची रहिवाशी असल्यामूळे मा. न्यायालयास सदरचा अर्ज निकाली काढण्याचा संपूर्ण अधिकार वह सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार

त्या हे या न्यायालयात मागणी करीत आहे. अर्थी सदरह जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस आमच्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुवतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक २१.०३.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोटांचे शिक्यानिशी दिले.

दिनांक २१.०३.२०२५

आदेशावरुन

क लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड




# भगवान महावीर जन्मकल्याण महोत्सवाच्या महिला समिती ची निवड संपन्न

## कार्याध्यक्षा पदी संगीता संचेती, तर महासचिव पदी सारीका साहुजी



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव दिनांक १० एप्रिल रोजी मोठया उत्साहाने साजरा करण्यात येणार असुन महिला समितीच्या वतीने विविध धार्मिक व सास्कृतीक कार्यकमांचे आयोजन करण्यात आले या साठी महिला समिती स्थापन करण्यात आली ही निवड सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रबाबु दर्डा व महासचिव महावीर पाटणी, उपाध्यक्ष प्रशांत देसरडा, जन्मकल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख यांच्या मार्गदर्शनाखाली २०२५ महिला कार्यकरणी समिती महिला मार्गदर्शीका भारती बागरेचा, करुणा साहुजी, भावना सेठीया, कविता अजमेरा, मंगला पारख मधु जैन,मेघा सुगंधी, सविता लोढा,तनुजा गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला समिती २०२५ ची निवड करण्यात आली. यामध्ये कार्याध्यक्ष पदी श्वेतांबर मुर्तीपुजक संघाच्या संगीता संचेती, महासचिव अग्रवाल दिंगबर जैन समाजाच्या सारीका साहुजी, कोषाध्यक्ष पदी तेरापंथ समाजाच्या ललीता साकला, खंडेलवाल दिंगबर जैन समाजाच्या मिना पापडीवाल, श्वेतांबर जैन स्थानकवासी संघाच्या कार्यकम सयोंजक पदी डिंपल पगारीया, मनिषा भंसाली तर खंडेलवाल दिंगबर जैन समाजाच्या सहसचिव पदी मंजु पाटणी, अनिता पहाडे, तर सैतवाल दिंगबर जैन समाजाच्या सहसचिव पदी वैशाली धोंगडे यांची निवड करण्यात आली.

यावेळी महिला समितीच्या सविता लोढा, ललीता साकला, निता गादीया, भारती बाकलीवाल, विदया मेहेत्रे, मिनाक्षी उदगीरकर, निता ठोले, चंदा कासलीवाल, स्वाती क्षिरसागर, साधना शहा, जयश्री गुजराथी, शिला पारख, ममता जैन, प्रसन्ना जैन, पल्लवी शहा, श्रृती साहुजी, वंदना कांकरीया, मित्तल जैन, सरीता भंडारी,रश्मी साहुजी, अर्चना साहुजी, संतोषी कोलानी, सुनिता छल्लानी आदींची उपस्थिती होती.

Process Paid Ex. 21
Sandeep M. Saraf, Advocate
Dhule, Dist. Dhule. (Maharashtra)

**PUBLIC - NOTICE**

BEFORE THE MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL OF DHULE
Claim For Rs. 5,00,000 /-
Claim Petition No. 30 / 2023
Rajesh Kalyansingh Thakare
Resident of: Kokankhede,
Taluka - Chandwad, ...APPLICANT
Dist. Nashik
V/S
Mahesh Rajendra Sant
Resident of: Vihamandava,
Taluka - Paithan. ...OPPONENT
Dist. Sambhaji Nagar
(Driver of Suzuki S Cross Car No. MH-20-DV-7299)

Whereas applicants have claimed compensation U/S 166, 140 of the Motor Vehicle Act, 1988 in respect of an accident of the nature specified in Section 166 of the Motor Vehicle Act against you No. 1 You deliberately time to time evade services of notice.

Therefore, you are informed by this legal public notice that, you No. 1 yourself or through your advocate without fail shall remain present before Accident Claims Tribunal, Dhule, Dist. Dhule, (Maharashtra) on 25/06/2025 at about 10:30 a.m. If you failed to appear on this date, Tribunal will proceed ex-parte on the presumption that you have no contention to make against the award of compensation.

Given under my hand & seal of the Tribunal this 26/03/2025 day of 2025

By Order
Sd/-
Superintendent
Dist. Court, Dhule.

Sd/-
Jr. Clerk.
Dist. Court, Dhule.

## सीआयआय पश्चिम विभागाच्या अध्यक्षपदी ऋषि कुमार बागला, उपाध्यक्षपदी वीर अडवाणी यांची निवड



छत्रपती संभाजीनगर – सीआयआय (कॉन्फेडेरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री) पश्चिम विभागासाठी २०२५–२६ चे नवे नेतृत्व जाहीर करण्यात आले आहे.बीजी इलेक्ट्रिकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लि. चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक ऋषि कुमार बागला यांची सीआयआय पश्चिम विभागाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे, तर ब्लू स्टार लि. चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक वीर अडवाणी यांची सीआयआय पश्चिम विभागाचे उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.

ही घोषणा सीआयआय (कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री) पश्चिम विभागीय परिषदच्या पहिल्या बैठकीत करण्यात आली. नव्या नेतृत्वाखाली व्यवसाय वृद्धी, शाश्वत विकास आणि जागतिक विस्तारावर विशेष भर दिला जाणार आहे सीआयआय पश्चिम विभागामध्ये महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि गोवा या प्रमुख राज्यांचा समावेश असून, उद्योगसंस्था, सरकार, शिक्षण क्षेत्र आणि समाज यांच्यातील सहकार्य अधिक बळकट करण्यासाठी नवीन नेतृत्व कार्यरत राहील.

## श्री क्षेत्र जैनगिरी (जटवाडा) येथे शनि अमावस्या अमावस्या निमीत्त पंचामृत अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – शहरापासुन १२ कि.मी.अंतराव असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थान श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक २९ मार्च २०२५ शनिवार(शनि अमावास्या)रोजी मुलनायक श्री.संकटहर पार्श्वनाथभगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येणार आहे.

# पोटविकारचे सर्व उपचार एका छताखाली : डॉ. चेतन राठी



छत्रपती संभाजीनगर : मेडीकव्हर हॉस्पीटलमध्ये कुठल्याही पोटविकार संदर्भात छोट्या पासुन ते गुंतागुंतीच्या आजारां पर्यंत चे निदान व उपचार एका छताखाली उपलब्ध झाले आहेत . पोटाच्या कोणत्याही आजाराचे पुर्णपणे निदान आणि उपचारासाठी स्वतंत्र टिम पोटविकार विभागात तयार करण्यात आली असून त्यात सिडिटी,अपचन ते लिव्हर प्रत्योरोपण पर्यंतची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. अशी माहीती पोटविकार विभागाचे प्रमुख डॉ. चेतन राठी यांनी दिली.

डॉ. राठी म्हणाले, 'नुकतेच अन्ननलिके संदर्भात पर ओरल एन्डोस्कोपीक मायोटॉमी (झजएच्) च्या चार प्रोसिजर केल्या. रुग्णांना अन्न व पाणी गिळण्याचा त्रास होता. अन्न नलिकेचा एक वाल्व टाईट असल्यामुळे जेवण खाली उतरत नाही. याला अकेलेजिया कार्डिया असे म्हणतात. या आजाराच्या चार रुग्णांना मेडिकव्हरच्या पोटविकार स्पेशालिस्ट टिम ने, अत्याधुनिक यंत्र सामुग्रीच्या मदतीने बरे केले . या चार रुग्णांपैकी तीन अभियंते होते. त्यांचे वय २० ते २५ वर्ष दरम्यान होते. अंदाजे गोळ्या घेवून, वेळीच योग्य निदान न झाल्याने त्यांचे वजण झपाट्याने कमी झाले होते. एका रुग्णाचे ६ महिन्यात तब्बल दहा किलो वजन घटले होते. त्यामुळे या आजारात निदान वेळेवर होणे गरजेचे आहे.'

अन्ननलिकेचे आजार कुठल्याही वयोगटातील व्यक्तींना होऊ शकतात. कोणालाही जेवण करतांना गळ्यात अन्न अडकत असेल तर एण्डोस्कोपी करणे निदानासाठी आवश्यक असते. जर वय कमी असेल तर सिडीटी किंवा अकेलेजिया कार्डिया सारखे आजार असु शकतात. वय अधिक असल्यास तो अन्ननलिकेचा कर्करोग ही असू शकतो. त्यामुळे याबद्दल सावधानता अधिक गरजेची असते. आरोग्यक्षेत्रातील प्रतिबंधक उपायातील लवकर निदान लवकर उपचार या मार्गदर्शक सुचने प्रमाणे वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरते.

लहान मुलांमध्ये कॉईन गिळणे अथवा काही लहान मोठी वस्तु गिळणे यासाठी तसेच मोठ्यांना छातीत जळजळणे, जेवण अटकणे, सिडीटी, उल्टी होणे, रक्त पडणे हे अन्ननलिकेचे आजार आहेत. या आजाराचे निदान एन्डोस्कोपीच्या माध्यमातून पोटविकार तज्ज्ञ करतात, असे डॉ. राठी यांनी सांगितले. मेडिकव्हर रुग्णालयाचे सेंटर हेड डॉ. दीपेन शाह यांच्या मार्गदर्शनात या विभागाचा विकास, सुविधांची वाढ सुरू असून रुग्णसेवेसाठी ही एक उपलब्धी निर्माण झाली आहे.



सोयगाव – जिल्हा परीषद छत्रपती संभाजीनगर येथे जळगाव येथून बदलीने आलेले नवीन मुख्यकार्यकारी अधिकारी अंकुश पन्नू यांचा सोयगाव शिक्षक मित्र परीवारा कडून स्वागत,सत्कार करताना शिक्षक भारती तालुकाध्यक्ष किरणकुमार पाटील,शिक्षक सेना तालुकाध्यक्ष रविंद्र शेळके व सोयगाव तालुक्यातील शिक्षक वृंद उपस्थित होते.

# रंगभूमी ते ओटीटी : मराठी नाट्यसृष्टीला डिजिटल माध्यमांतून नवीन दिशा!

मुंबई, २५ मार्च २०२४ – सिनेमा आणि ओटीटीच्या प्रभावामुळे नाटक मागे पडेल असं अनेकांना वाटत होतं, पण तसं झालं नाही. उलट, आता डिजिटल काळातील रंगभूमी नव्या पायरीवर पोहोचतेय. समांतर नाट्यप्रवाह, एकांकिका, डिजिटल थिएटर आणि इमर्सिव्ह थिएटर यांसारख्या नव्या संकल्पनांमुळे रंगभूमीला नवसंजीवनी मिळतेय. आणि या 'वर्ल्ड थिएटर डे' निमित्त आपण भूतकाळ आणि भविष्य दोन्ही जपण्याचा संकल्प करूया! कारण 'तिसरी घंटा, पुन्हा एकदा'! या खास उपक्रमात, ती खास तिसरी घंटा पुन्हा वाजणार आणि प्रेक्षकांना ७० हून अधिक भन्नाट मराठी नाटकांचा आनंद डिजिटल माध्यमातून अल्ट्रा झकास ओटीटी वर अनुभवता येणार आहे.

कधीकाळी विजय चव्हाण, लक्ष्मीकांत बेर्डे, रमेश भाटकर, प्रदीप पटवर्धन, निळू फुले, अविनाश खर्षीकर, अतुल परचुरे, मच्छिंद्र कांबळी यांसारख्या दिग्गज कलाकारांनी आपल्याला रंगभूमीवरून खळखळून हसवलं, विचार करायला लावलं आणि मनात कायमचं स्थान निर्माण केलं. मात्र, आज त्यांची जिवंत अभिनयशैली, प्रेक्षकांना बांधून ठेवण्याची ताकद पुन्हा अनुभवता येईल असं वाटत नव्हतं. पण अल्ट्रा झकास मराठी ओटीटीच्या मदतीने हे शक्य झालेलं आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश मा. अग्रवाल मॅडम साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र.८३/२०२५

अर्जदार : १) सिताराम गिननदेव गव्हाणे वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) मच्छिंद्र गिननदेव गव्हाणे वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) भगवान गिननदेव गव्हाणे वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सुनिता भ्र. शिवाजी भंडारे, वय ४५ वर्षे, धंदा शेती रा. सुराळेगाव ता. गेवराई जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र.१ ते ४ यांनी त्यांचे विधिज्ञः ॲड. श्री. एस.के. लांडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे आपसांत नात्याने सख्ख भाऊ असुन अर्जदार क्र. ४ ही अर्जदार क्र.१ ते ३ यांची बहिण आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांचे वडील नामे गिननदेव दुलीराम गव्हाणे हे मौजे महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २७/०५/२०११ रोजी मौजे महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे तसेच अर्जदार क्र.१ ते ४ यांची आई नामे गेंदावाई गिननदेव गव्हाणे ह्या दिनांक १५/११/२०२४ रोजी मौजे महालक्ष्मीखेडा ता. गंगापुर येथे मयत झालेल्या आहे. मयत गिननदेव दुलीराम गव्हाणे व मयत गेंदाबाई गिननदेव गव्हाणे यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदद्यीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारंस प्रमाणपत्र जारी करील. प्रकरणात पुढील तारीख ११/०४/२०२५ रोजीची आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्कयानी आज दिनांक २५/०३/२०२५ रोजी दिले आहे.

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

व्ही.एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात

दि. किरकोळ अर्ज क्र. १९२/२०२५

पुढील तारीख ०८/०५/२०२५

अर्जदार :– १– अमोल पिता लक्ष्मण सोनवणे, वय २८ वर्ष, धंदा शेती. रा. निंभोरा ता. कन्नड जि. औरंगाबाद. २– आशिष पिता लक्ष्मण सोनवणे, वय ४० वर्ष, धंदा शेती. रा. निंभोरा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. स्मिता भ्र. सुरेश सांगळे, वय ४२ वर्ष, धंदा–घरकाम, रा.एन–११. सी– ३.९/१ गजानन नगर हडको. औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद, ४– लिलाबाई भ्र. लक्ष्मण सोनवणे, वय ५७ वर्ष, धंदा घरकाम, रा. निंभोरा ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार:– महाराष्ट्र शासन व्दारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

अर्ज :– बॉम्बे रेग्यलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायदेशिर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअथो अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु.ए. वारे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, लक्ष्मण पिता राजराम सोनवणे हे दिनांक २७/१२/२०२३ रोजी मोजे निंभोरा ता. कन्नड येथे मयत झाले असुन त्यांचे अर्जदार क्रं. १ व २ हे मुले असुन अर्जदार क्रं. ३ ही विवाहीत मुलगी आहे, अर्जदार क्रं. ४ ही पत्नी आहे.

अर्जदार क्र. १ ते ४ यांना शासकिय व निमशासकिय कामे करण्यासाठी ग्रामपंचायत निंभोरा ता. कन्नड व तहसिल कार्यालय, तलाठी कार्यालय, नगरपालिका कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, तसेच इतर शासकिय –व निमशासकिय कार्यालयात काम करण्यासाठी वारस प्रमाणपंची आवश्यकता. अर्जास कारण दिनांक २८/०२/२०२५ रोजी घडले आहे. मयत लक्ष्मण पिता राजराम सोनवणे यांचे अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर वारस आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक २०/०३/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. १६२/२०२५

पु.ता. १६/०४/२०२५

अर्जदार : १) गयाबाई जनार्धन राऊत, वय ७७ वर्षे, भंदा, शेती, रा. कोडापुर ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) ज्ञानदेव जनार्धन राऊत, वय. ६२ वर्षे, भंदा, शेती, रा. कोडापुर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) परसराम जनार्धन राऊत, वय. ५५ वर्ग, धंदा, शेती, रा. कोडापुर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) कौसाबाई बाबुराव पठाडे, वय. ७० वर्षे, धंदा, शेती, रा. तांडोळी ता. पैठण जि. औरंगाबाद ५) प्रयागाबाई ज्ञाणदेव गावंडे, वय. ६७ वर्षे, धंदा, शेती, रा. मांगेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६) चंद्रकला आबासाहेब भवर, वय. ५७ वर्षे, धंदा. शेती, रा. औरंगपुर ता. पैठण जि. औरंगाबाद ७) पार्वती हरिचंद्र लघाने, वय. ५० वय. धंदा. शेती, रा. रांजनगांव खुरी, ता. पैठण जि. औरंगाबाद ८) शिलाबाई शाईनाथ शेजुळ, वय. ४५ वय. धंदा. शेती, रा. तोंडोळी, ता. पैठण जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार –निरंक

प्रकरण – वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ चे पती नामे जनधिन विश्वनाथ राऊत व अर्जदार क. २ ते ८ चे वडील नामे जनार्धन विश्वनाथ राऊत हे मौजे कोडापुर ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. १८/०५/२०१७ रोजी मौजे कोडापुर ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत तसेच. अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ८ यांची आई असुन अर्जदार क. २ ते ८ हे आपसात सख्खे बहीन भाउ असून आपसात नातेवाईक आहे. अर्जदार क. १ ते ८ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे जनार्धन विश्वनाथ राऊत यांना अर्जदार क. १ ते ८ हे एकमेव कायदेशीर वारसदार असून यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयतांच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ८ हेय एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : २५/०३/२०२५ २५/०३/२०

आदेशविरून

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ६२/२०२५

पु.ता. १७/०४/२०२५

अर्जदार : १) त्रिंबक भिवसन वल्ले, वय. ६८ वर्षे, धंदा, शेती, रा. पांढरओहळ पो. सावखेडा ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) सुरेश भिवसन वल्ले, वय. ५० वर्षे, धंदा, शेती, रा. पांढरओहळ पो. सावखेडा ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) चंद्रकला गंगाधर खरपस, वय. ६२ वर्षे, धंदा, शेती, रा. फुलेनगर, लासुर नाका गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) मंदाबाई अशोक तांगडे, वय. ५५ वर्षे, धंदा, शेती, रा. वार, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ५) साधना गोंविद कोळगे, वय. ४८ वर्षे, धंदा, शेती, रा. शेंदुरवादा ता. गंगापूर जि. औरंगाबाद ६) लक्ष्मण उत्तम निकम, वय. ४५ वर्षे, धंदा, शेती, रा. शेंदुरवादा ता. गंगापूर जि. औरंगाबाद ७) संदिप उत्तम निकम, वय. ३५ वर्षे, धंदा, शेती, रा. शेंदुरवादा ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण :– वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ ते ५ चे वडील व अर्जदार क. ६ व ७ चे आजोबा नामे भिवसन तुकाराम वल्ले हे दि. १७/०१/२००९ रोजी मौजे पांढरओहळ ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत तसेच, अर्जदार क. १ ते ५ ची आई व अर्जदार क. ६ व ७ ची आजी नामे सुभद्राबाई भिवसन वल्ले ही दि. २२/०९/२०१० रोजी मौजे पांढरओहळ ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे, तसेच, अर्जदार क. १ ते ५ यांची सख्खी बहीन व अर्जदार क. ६ व ७ ची आई नामे भिमाबाई उत्तम निकम ही दि. १२/०६/२००६ रोजी मौजे शेंदुरबादा ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. अर्जदार क. १ ते ५ हे आपसात सख्खे बहीन भाउ असून अर्जदार क. ६ व ७ हे अर्जदार क. १ ते ५ यांची मयत्त बहीन नामे भिमाबाई उत्तम निकम यांचे आपत्य आहे. याप्रमाणे अर्जदार क. १ ते ७ हे आपसात नातेवाईक आहे. अर्जदार क. १ ते ७हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे भिवसन तुकाराम वल्ले व मयत सुभद्रबाई भिवसन वल्ले यांना अर्जदार क. १ ते ७ हे एकमेव कायदेशीर वारासदार असून यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. भयतांच्या माधारी केवळ अर्जदार क. १ ते ७ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/ निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : २५/०३/२०२५

आदेशावरून

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ११३/२०२५.

नि. क्रं.

१. चंद्रकला समाधान मंडवे, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. आमखेडा, ता.सोयगांव, जि. छ.संभाजीनगर. २. प्रतिक समाधान मंडवे, वय २४ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे. ३. भुषण समाधान मंडवे, वय २० वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत समाधान बाबुराव मंडवे यांचा दिनांक २५/११/२०२३ रोजी जनरल हॉस्पीटल वाशी, नवी मुंबई येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत समाधान बाबुराव मंडवे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजरं अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २७/०३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले असे.

पु.ता. २४/०४/२०२५

आदेशावरुन

लिपीक सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११८/२०२५

१/– आनंदीबाई मधुकर बावस्कर उर्फ पाटील, वय ७६ वर्ष, धंदा घरकाम, रा. घोसला, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/– भारत मधुकर बावस्कर उर्फ पाटील, वय ४९ वर्षे, धंदा, शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/– पंडित मधुकर बावस्कर उर्फ पाटील, वय ४६ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

कुणीही नाही

प्रकरण – वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत मधुकर बळीराम बावस्कर उर्फ पाटील यांचा दि. २१/११/२०२४ रोजी मौजे घोसला, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मयत झालेले असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ ही वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी मयत मधुकर बळीराम बावस्कर उर्फ पाटील यांचे वारस असुन त्यांना मयत मधुकर बळीराम बावस्कर उर्फ पाटीलयांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. २४/३/२०२५ रोजो सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले असे.

पु. ता. २४/०४/२०२५

आदेशावरुन

लिपीक सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं./११६/२५

१/– दगडू नामदेव ढगे, वय ७० वर्ष, धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद. २/– रघुनाथ नामदेव ढगे, वय ५३ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अड. सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत गयाबाई नामदेव ढगे यांचा दिनांक २९.०४.२०२३ रोजी मौजे आमखेडा, ता. सोयगाव, जि. छ संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ व २ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत गयाबाई नामदेव ढगे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २४/३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले असे.

पु. ता. २४/४/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ११७/२०२५

१/– लिलाबाई मंजाराम काटकर, वय ७५ वर्ष, धंदा घरकाम, रा. नायगाव, ता. सोयगाव जिल्हा. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद). २/– शिवाजी मंजाराम काटकर, वय ४० वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ३/– नामदेव मंजाराम काटकर, वय ३७ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ४/– सुखदेव मंजाराम काटकर, वय ३५ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत मंजाराम नारायण काटकर यांचा दिनांक २६.०३.२०१५ रोजी मौजे नायगाव, ता. सोयगांव, जि. छ संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत मंजाराम नारायण काटकर यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दिनांक २८/३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले असे.

पुढील तारीख २४/४/२०२५

आदेशावरुन

लिपीक सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## अग्रलेख...

# महिला सशक्तीकरणाचा मोदीमंत्र

'नारी अस्य समाजस्य कुशलवस्तुकार अस्ति' अर्थात स्त्री ही समाजाची आदर्श शिल्पकार आहे. भारतीय तत्त्वज्ञानातील हा उल्लेख महिलांमधील शक्ती आणि कला प्रकट करतो. भारतात, महिला नेहमीच अग्रणी, प्रथम राहिल्या आहेत. मातृशक्तीला आदिशक्ती मानले जाते. आपल्या परंपरा, संस्कृती आणि विचारसरणीत महिलांचा आदर केला जातो. त्याच महिलांची भारतातील आजची सुधारलेली स्थिती सर्वत्र कौतुकास पात्र ठरत आहे. कुणी म्हणेल एकीकडे महिलांवरील अत्याचारांमध्ये वाढ झालेली असताना, तुम्ही महिलांच्या प्रगतीचे, यशस्वितेचे गोडवे कसे गाऊ शकता? पण त्यालाही निरुत्तर केले जाऊ शकते. गेल्या काही वर्षांत महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांची पोलिसांमध्ये होणारी नोंद वाढली असल्याने त्यांच्यावरील गुन्ह्यांमध्ये प्रचंड वाढ झालेली दिसते आहे. पूर्वी महिलांविरुद्धचे गुन्हे थेट पोलिसांपर्यंत पोहोचण्यासारखी परिस्थितीच नव्हती. त्यामुळे महिलांच्या प्रगतीचा मुद्दा जिथे कुठे चर्चिला जाईल तेथे या बदललेल्या परिस्थितीचा उल्लेख देखील केलाच जायला हवा. सर्वच क्षेत्रांमध्ये आता पूर्वीची सरकारे आणि आताचे सरकार यांच्या कामगिरीची तुलना होऊ लागली आहे. संसदेतील आणि विभिन्न राज्य विधानसभांमधील लोकप्रतिनिधींच्या चर्चांमध्ये अशी तुलना होत असल्याची कितीतरी उदाहरणे देता येतील. या विषयावरून एकमेकांवर कुरघोडी करण्याचे राजकारणही सुरू असते. म्हणून काही मोदी सरकारने महिला उत्थानासाठी केलेल्या उपाययोजना दुर्लक्षित होतील असे नाही. सरकारच्या अर्थात सरकारी कर्मचाऱ्यांच्या आणि सत्ताधारी पक्षाच्या कार्यक्षमतेचा मुद्दा उपस्थित होताच मोदी सरकारच्या आणि पूर्वीच्या काँग्रेस सरकारच्या कार्यशैलीची तुलना होतेच. रस्ते, पायाभूत सुविधा, विज्ञान तंत्रज्ञान, दळणवळण, पर्यटन, रेल्वे, संरक्षण, महसूल, अर्थ अशी कितीतरी खाती आहेत, ज्या क्षेत्रातील मोदी सरकारची प्रगती डोळे दीपवून टाकणारी म्हणावी लागेल. या सर्वांची आकडेवारीही उपलब्ध आहे. याच मालिकेत महिलांच्या कामगिरीचाही मुद्दा प्रकर्षाने चर्चिला जातो आहे. अशी कितीतरी क्षेत्रे महिलांनी गेल्या काही वर्षांत पादाक्रांत केली असून, सर्वच क्षेत्रांत महिलांचा टक्का वाढलेला दिसतो आहे. संरक्षण क्षेत्रात जिथे प्रत्यक्ष लढाईशी संबंध असलेल्या क्षेत्रात महिलांच्या भरतीचा विचारही होत नव्हता, अशी क्षेत्रे मोदींनी महिलांसाठी खुली करून दिली आहेत. मिळालेल्या संधीचा महिलांनीही योग्यरीत्या उपयोग करून, देशाचे नाव इतिहासात नोंदविले आहे. गेल्या ११ वर्षांच्या कार्यकाळातील महिलांच्या कामगिरीची झलकच मोदी सरकारने नुकत्याच प्रसिद्धीस दिलेल्या एका जाहिरातीद्वारे करून दिली आहे. या योजनांमुळे देशातील महिलांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवून आणला असून, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेल्या ठोस पावलांमुळे शिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि सामाजिक सुरक्षिततेसारख्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. उज्ज्वला योजना, बेटी बचाओ बेटी पढाओ, मातृ वंदना योजना, मुद्रा योजना, महिला शक्ती केंद्र, सैनिकी शाळांमधील महिलांचे प्रवेश, सीआरपीएफ आणि सीआयएसएफमधील महिलांसाठीचे विशेष आरक्षण, महिलांच्या प्रसूती रजेतील वाढ यासारख्या उपक्रमांनी महिलांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य केले आहे. महिलांना संधी दिली तर त्यासुद्धा आपल्यातील गुणांचे प्रकटीकरण करून देशाच्या विकासात हातभार लावू शकतात, हेच या योजनांच्या अंमलबजावणीतून सिद्ध झाले आहे. या तुलनेत काँग्रेसच्या कार्यकाळात महिलांच्या प्रगतीसाठी विशेष पावले उचलली न गेल्याने त्या पिछाडीवरच राहिल्या. मोदी सरकार केवळ जाहिराती प्रसिद्ध करून जगाचे लक्ष वेधू इच्छित नाही. महिलांबाबतच्या विविध योजनांच्या आकड्यांचीही त्यांच्या कार्यकर्तृत्वाला जोड आहे. बेटी बचाओ बेटी पढाओ या अभियानाने लिंगभेदावर मात करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणिताच्या क्षेत्रांत महिला आणि मुलींची अत्यल्प उपस्थिती ही भारतातील धोरणकर्त्यांसाठी सतत चिंतेची बाब राहिली आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे या क्षेत्रातील महिलांचा सहभाग घटतो, ज्यामुळे त्यांच्या करीअरला ब्रेक मिळतो आणि त्यांची कामावरील गैरहजेरी वाढते. यासंदर्भात केलेल्या उपाययोजनांमुळे भारतातील संशोधन आणि विकास उपक्रमांमध्ये आज १८.६ टक्के महिला संशोधक बघायला मिळत आहेत. 'विमेन इन सायन्स ॲण्ड इंजिनीअरिंग-किरण' ही योजना महिलांना करीअरच्या विश्रांतीनंतर पुन्हा कामावर परत येण्यासाठी प्रोत्साहित करते. विज्ञान ज्योती कार्यक्रमांतर्गत, ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींवर लक्ष केंद्रित केले जाते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीने अलिकडच्या वर्षांत अतिरिक्त जागा सुरू करून महिलांचे प्रवेश वाढवले आहेत. संरक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी परीक्षेसाठी महिला अर्जदारांची वार्षिक वाढ १५ टक्के आहे. तीनही सेवांमध्ये महिलांचे २० टक्के प्रतिनिधित्व साध्य करण्याचे लक्ष्य २०३० पर्यंत निर्धारित करण्यात आले आहे. भारतीय सशस्त्र दलात महिला अधिकाऱ्यांची संख्या ११ हजारांहून अधिक आहे. निवड प्रक्रिया कठोर निकषांवर आधारित असूनही महिला उमेदवारांना समान संधी दिल्या जात आहेत. स्टार्टअप इकोसिस्टममध्ये लहान शहरांमधील नवउद्योजकतेच्या वाढीसोबतच महिलांचा सहभागही उल्लेखनीय ठरत आहे. 'नॅशनल स्टार्टअप अवॉर्ड्स' पुरस्कारासाठी नामांकन मिळालेल्या एकूण स्टार्टअप्सपैकी २० टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहेत.

२०२१-२०२२ मधील आर्थिक सर्वेक्षणानुसार, महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मोदी सरकारने मुद्रा योजनेंतर्गत २५ कोटींहून अधिक कर्ज वितरित केले होते, ज्यापैकी सुमारे ७० टक्के कर्ज महिला उद्योजकांना देण्यात आले आहे. यामुळे महिलांचे आर्थिक सशक्तीकरण अधिक मजबूत झाले आहे. एप्रिल २०२३ मधील केंद्र सरकारच्या अहवालानुसार ग्रामीण विकास मंत्रालयाच्या दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील १० कोटी महिलांना महिला बचत गटांमध्ये समाविष्ट करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय मोहीम सुरू करण्यात आली. मोदी सरकारच्या कार्यकाळात महिलांची प्रसूती रजा १२ आठवड्यांवरून २६ आठवड्यांपर्यंत वाढवली गेली. प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात महिलांना हक्काची मालकी देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या टप्प्यात, लाभार्थींच्या कुटुंबातील महिला सदस्यांच्या नावावर घर असणे अनिवार्य करण्यात आले आहे. योजनेत 'स्त्री मालकी' आणि 'संयुक्त मालकी' असे पर्याय उपलब्ध केले गेले असून, सबसिडी असलेल्या घरांच्या निर्मितीत 'केवळ पुरुषांची' नोंदणी पूर्णपणे काढून टाकण्यात आली आहे. महिलांना प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे पीएम आवास योजनेअंतर्गत दिलेल्या घरांपैकी ७५ टक्के घरे केवळ महिलांच्या किंवा संयुक्त स्वरूपात त्यांच्या मालकीची असतील. विशेष म्हणजे, या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात महिलांना १०० टक्के घरमालकी प्रदान केली जाणार आहे. केंद्र सरकारच्याच प्रयत्नांमुळे आज १० कोटींपेक्षा जास्त स्वयंपाकघरांमध्ये उज्ज्वला गॅस जोडणी पोहोचली असून, १५ कोटींपेक्षा जास्त घरांना नळाद्वारे पाण्याची जोडणी मिळाली आहे. आजवर सुमारे १२ कोटी शौचालये बांधण्यात आले आहेत. मोदी सरकारने २०१९ मध्ये तिहेरी तलाक पद्धत बेकायदेशीर ठरवली. आज मुस्लिम महिला एकट्याने हजला जाऊ शकतात, त्यासाठी मोदी सरकारनेच पुढाकार घेतला आहे. महिला सशक्तीकरणासाठी उचललेली मोदी सरकारची पावले म्हणून स्तुत्य, अनुकरणीय आणि कौतुकास्पद ठरत आहेत. एक महिला सुज्ञ झाली की परिवारातील १०० जणांना सुज्ञ करते, असे म्हणतात. त्यामुळे यापुढेही मोदी सरकारने महिलांच्या सशक्तीकरणाचा मंत्रजप करीत बलशाली राष्ट्राच्या उभारणीत सिंहाचा वाटा उचलावा. ▮

## इतस्तत:

# छद्मी धर्मनिरपेक्षता

**डॉ. विवेक राजे**

भारत स्वतंत्र होतानाच या देशाची धार्मिक आधारावर फाळणी झाली. या देशाचे तीन तुकडे करण्यात आले. पाकिस्तान नावाचा एक देश या देशाच्या पूर्व आणि पश्चिमेला उदयाला आला. कालांतराने पूर्वेकडील भूप्रदेश हा बांगलादेश झाला. धार्मिक आधारावर फाळणी होऊनही तेव्हाच्या देशाच्या नेतृत्वाला मात्र धर्मनिरपेक्ष शासन पद्धती या संकल्पनेची भुरळ पडली होती. वास्तविक या हिंदू देशावर ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मांनी धर्म प्रसारासाठी धर्माच्याच आधारावर केलेले अत्याचार तेव्हाही या देशाला चांगल्या प्रकारे माहिती होते. पण या देशात इंग्रजी सत्तेने पेरलेल्या नेत्यांकडेच देशाचे नेतृत्व जावे, अशी तजवीज ब्रिटिशांनी केली. नेतेपद हे देश पुनरुत्थानाचे साधन असते. राष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक, सामाजिक संकल्पना सुधारून पुनर्स्थापित करणे हे डोळस नेतेपण असते, याची जाणीवच नेतेपदाची माळ गळ्यात मिरवणाऱ्यांना नव्हती. पुढे आणिबाणीच्या काळात संपूर्ण विरोधी पक्ष जेलमध्ये असतानाच संसदेत घटना दुरुस्ती करीत धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) हा शब्द घटनेत घुसवण्यात आला. आधीच सर्व हिंदू धर्म संकल्पना नाकारणारे दृष्टिहीन नेते विविध सत्ताकेंद्रांवर बसलेले असताना घटनेच्या उद्देशिकेत 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द आल्याने स्थिती अधिकच बिघडली. मग विविध विद्यापीठांमध्ये हिंदू तत्त्वज्ञान, हिंदू धर्म यांचा अभ्यास सोडून इतर धर्मांचा अभ्यास व्हावा म्हणून विभाग वा अध्यासने स्थापन केली गेली. म्हणजे ख्रिश्चन स्टडीज, इस्लामिक स्टडीज यांच्या जोडीला काही ठिकाणी बुद्धिस्ट फिलॉसॉफी चेअर, चेअर फॉर बुद्धिस्ट थॉट्स अशा प्रकारची अध्यासने, विभाग स्थापन झाले. दुर्दैवाने या हिंदुबहुल देशात हिंदू विचारधारेला, हिंदू तत्त्वज्ञानाला, हिंदू धर्म परंपरांचा इतिहास, संस्कृत भाषा वा वेदांच्या अभ्यास व प्रचारासाठी ना विभागांची निर्मिती झाली ना अध्यासनांची स्थापना करण्यात आली. विद्यापीठं जाऊ द्यात, हिंदुत्वाच्या विचारसरणीचा गड मानलेल्या प्रदेशांमध्येदेखील वेदांचा अभ्यास आणि प्रसार, सनातन वैदिक विचारांचा अभ्यास व प्रसार, स्वातंत्र्यवीर सावरकर वा डॉ. मुंजे यांच्या विचारांचा अभ्यास व प्रसार करण्यासाठी स्वतंत्र विभाग वा अध्यासन स्थापन केले गेले नाही. एक तर या विषयांवर विभाग वा अध्यासने निर्माण केली तर सरकारी अनुदाने मिळण्याची शक्यता शून्य होती. दुसरे म्हणजे दिशाभूल झालेला समाज या विषयांची उपेक्षाच करीत होता. अगदी बिर्ला इन्स्टिट्यूट पिलानीचे विद्यार्थी असलेल्या दीनदयाल उपाध्याय वा भारतरत्न नानाजी देशमुख विचार व कार्य, अध्यासनाची निर्मिती त्या संस्थेत आजही केली गेलेली नाही. एक-दोन विद्यापीठांत सनातन धर्म अध्ययन व अनुसंधान अध्यासने आहेत, पण ते अपवाद म्हणून. दक्षिणेकडील विद्यापीठांमध्ये ख्रिश्चन धर्म अध्ययन तर उत्तरेकडील विद्यापीठांमध्ये इस्लाम धर्म अध्ययन व अनुसंधान विभागांची स्थापना करण्यात आली.



त्यातच धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचा सर्वांगीण अभ्यास न होताच ती लोकप्रिय करण्यात साम्यवादी विचारसरणीला यश मिळाले. वास्तविक भारतातील संविधान आपल्या २५ व्या कलमाद्वारे धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना असे म्हणते की, भारतातील कोणत्याही व्यक्तीला त्याला योग्य वाटणाऱ्या उपासनेचा, धर्मपालनाचा, पारलौकिक कल्याणाचा, आध्यात्मिक उन्नतीचा पूर्ण अधिकार आहे. या अधिकारात धर्माच्या नावावर सरकार हस्तक्षेप करणार नाही तसेच मदत व विरोधही करणार नाही. सामाजिक व राजकीय जीवनात व्यक्ती-व्यक्तीमध्ये धर्माच्या नावाने भेदभाव केला जाणार नाही. पुढे जाऊन याच घटनेचे कलम २३ अल्पसंख्यकांना आपली भाषा, संस्कृतीची जोपासना करण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापण्याचा अधिकार प्रदान करते. कलम २९ आणि ३० मात्र बहुसंख्य असलेल्या हिंदूंच्या धर्मप्रसाराचा अधिकार नाकारतानाच अल्पसंख्यक समाजाला धर्मप्रसाराची संपूर्ण मुभा देताना दिसते. वास्तविक धर्मनिरपेक्ष शासन व्यवस्थेमध्ये शासनाने धर्म वा संस्कृती या बाबतीत संपूर्ण तटस्थ असायला हवे. ही तटस्थता एकधर्मीय देशांमध्ये राखणे सहज शक्य असते. ही तटस्थता राखण्यासाठी बहुधर्मीय भारतात विशेष प्रयत्न आवश्यक होते. मात्र, पाश्चात्त्य व मध्यपूर्वेतील देशांमध्ये बहुसंख्य असलेल्या लोकांनी अल्पसंख्य लोकांवर अन्याय केल्याची अनेक उदाहरणे असल्याने, तोच प्रघात भारतातही चालेल, या अनाठायी भीतिपोटी धर्मनिरपेक्षतेची संकल्पना आणि तिचा प्रसार मुस्लिम व ख्रिश्चन या अल्पसंख्यक समाजांना अनुकूल राहील, असा करण्यात आला. आजही तामिळनाडू राज्य या प्रावधानांचा दुरुपयोग करून ख्रिश्चन अनुनयाचे धोरण राबविताना दिसते. या अनाकलनीय कलमांचे आणि धोरणाचे उदाहरण म्हणजे मद्रास विद्यापीठाच्या 'डिपार्टमेंट ऑफ ॲनसन्ट हिस्ट्री ॲण्ड आर्चियालॉजी' या विभागाने 'हाऊ टू स्प्रेड ख्रिश्चानिटी इन इंडिया आणि व्हाय नीड धीस मार्गम' या विषयांवर तीन तासांचे एक व्याख्यान आयोजित करणे होय. तेथील हिंदू संघटनांनी यावर आक्षेप नोंदवत आंदोलनाचा पवित्रा घेतल्याने हे व्याख्यान नंतर रद्द करण्यात आले.

हजारो वर्षे सर्व प्रकारचे अत्याचार करूनही या मातीत हिंदू धर्म वगळता इतर कोणत्याही धर्माला आपले पाय घट्ट रोवता आलेले नाहीत. दक्षिण भारतातील लाखो हिंदूंची अक्षरशः फसवणूक करूनही ख्रिश्चन धर्म अजूनही या देशात हवा तो जम बसवू शकलेला नाही.

आज युरोपातील अनेक देश स्वतःला ख्रिश्चन देश म्हणून घेतात, तर मध्य पूर्वेतील सर्व देश स्वतःला इस्लामिक देश म्हणवून घेत पौर्वात्य देशांवर शक्य त्या मार्गाने धार्मिक आक्रमण करताना दिसतात. अनेक शतकांपासून चालू असलेल्या या धर्म प्रसाराच्या किळसवाण्या प्रयत्नांना जोड मिळावी म्हणून या देशाच्या संविधानात धर्मनिरपेक्षता ही संकल्पना घुसवावी लागते आणि मग आधीच ख्रिस्ताळलेल्या या देशातील धर्मनिरपेक्ष शिक्षण पद्धतीला विविध अध्यासने व विभागांच्या द्वारे धर्मप्रसारासाठी जुंपावे लागते. तरीही हवे ते यश या देशात इस्लाम आणि ख्रिस्ती मिशनरींना मिळालेले नाही. याला कारण हिंदू धर्मात असलेली लवचीकता व स्वातंत्र्य, अत्यंत जीवनाभिमुख असलेले हिंदू तत्त्वज्ञान तसेच या धर्माने निर्माण केलेली येथील निसर्गाशी तादात्म्य पावणारी जीवनपद्धती होय. तसेच मागील किमान ५०-६० वर्षे विविध प्रदेशांत घट्ट पाय रोवून हिंदू धर्म संरक्षण करणाऱ्या हिंदू संघटना व जीवाची पर्वा न करता तेथे निरलस वृत्तीने कार्य करणारे कार्यकर्ते होत.

प्रशासन आणि अनेक लोकप्रतिनिधी मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मांचे बाजू घेताना दिसतात. याला कारण घटनेत आणिबाणीच्या काळात इंदिरा गांधी यांनी घुसडलेली धर्मनिरपेक्षता ही संकल्पना होय. या संकल्पनेचा पुन्हा विचार होऊन सध्या ती संकल्पना ज्या अर्थाने मांडली जाते, त्यात सुधारणा गरजेची आहे. याकरिता आपसातील सत्तास्पर्धा, वैचारिक, सामाजिक, आर्थिक, भाषीय असे सर्व मतभेद बाजूला ठेवून हिंदू समाजाने एकवटून प्रयत्न करणे आवश्यक आहे. वक्फ कायद्यात बदलाचे प्रस्तावित बिल आणि समान नागरी कायदा तातडीने लागू करण्यासाठी हिंदू समाजाने आज दबाव आणला पाहिजे तसेच विविध प्रकारे सामान्य नागरिकांचा बुद्धिभेद करण्याचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी प्रबुद्ध नागरिकांनी एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजेत. हिंदू धर्म, हिंदू संस्कृती, हिंदू जीवनदृष्टी आणि तत्त्वज्ञान यांची जोपासना करायची असेल तर या छद्म आक्रमणाचा, छद्मी धर्मनिरपेक्षतेचा समाजाच्या सर्व स्तरांवर विरोध व्हायला हवा तरच हा देश ही संस्कृती भविष्यातही दृश्यमान राहील आणि 'समाज कुछ बात हैं की हस्ती, मिटती नहीं हमारी' असे अभिमानाने म्हणू शकेल. ▮

९८८१२४२२२४

## वेध

# गडचिरोली पोलिसांचा महाराष्ट्रात डंका

**नंदकिशोर काथवटे**

जिथे 'पेन' असते तिथे 'गेन' असते असे म्हणतात. गडचिरोली जिल्ह्यात पूर्वी पोलिस विभागात नोकरी करणाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. जिवावर उदार होऊन अतिशय जिकरीने गडचिरोलीच्या पोलिसांनी नक्षल्यांविरुद्ध दंड थोपटले आणि आज याच गडचिरोली पोलिसांचा अख्ख्या महाराष्ट्रात डंका गाजू लागला आहे. नक्षल चळवळ खिळखिळी करून दुर्गम भागातील नक्षल्यांचे बस्तान मोडून काढण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले आहे. पोलिसांच्या आक्रमक मोहिमेमुळे दंडकारण्य झोनमधील नक्षली बॅकफूटवर गेले आहेत. या पृष्ठभूमीवर गडचिरोली पोलिस दलाचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात गाजू लागले आहे. त्याला कारणही तसेच आहे. गडचिरोली पोलिसांनी केवळ नक्षल्यांविरोधात लढा उभारला नाही तर नक्षल्यांच्या दहशतीत असलेल्या लोकांमध्ये विश्वास निर्माण केला. सोशल पोलिसिंगच्या माध्यमातून आदिवासी आणि पोलिसांमध्ये सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले. त्यामुळेच नक्षल्यांचे आत्मसमर्पणसुद्धा वाढले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री वर्षाच्या पहिल्याच दिवशी गडचिरोलीत दाखल झाले. त्यांच्या उपस्थितीत तारक्का या जहाल महिला नक्षलीने पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. जवळपास ३२ वर्षे नक्षल चळवळीत घालविलेल्या तारक्काच्या आत्मसमर्पणामुळे नक्षल चळवळीचे कंबरडे मोडले. एका बाजूने नक्षल्यांविरोधात उघड मोहीम राबवीत पोलिसांनी नक्षल्यांना गडचिरोलीच्या जंगलातून हद्दपार केले. तर, दुसरीकडून आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी पोलिसांनी विविध उपक्रम राबविले. याच उपक्रमाचा एक भाग 'प्रोजेक्ट उडाण' असून, या उपक्रमाची दखल घेऊन नुकताच गडचिरोली पोलिसांना भारतीय वाणिज्य व उद्योग महासंघाच्या वतीने देण्यात येणारा 'फिक्की स्मार्ट' पोलिसिंग पुरस्कार प्राप्त झाला आहे. नवी दिल्ली येथील फिक्की फेडरेशन हाऊस येथे आयोजित करण्यात आलेल्या एका सोहळ्यात पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांना सन्मानित करण्यात आले आहे. यापूर्वीसुद्धा गडचिरोली पोलिसांना राज्य सरकारचे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सोशल पोलिसिंगचा उत्कृष्ट पुरस्कार याशिवाय तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी गडचिरोली पोलिसांची मान संपूर्ण राज्यात उंचावली आहे. 'कम्युनिटी पोलिस' या श्रेणीतून गडचिरोली पोलिस दलाची निवड पुरस्कारासाठी करण्यात आली असून 'प्रोजेक्ट उडाण' हा उपक्रम या पुरस्कारासाठी महत्त्वाचा ठरला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम-अतिदुर्गम भागांतील आदिवासी नागरिकांच्या सर्वंकष विकासासाठी गडचिरोली पोलिस दलाच्या वतीने ३ मार्च २०२३ रोजी 'प्रोजेक्ट उडाण' हा उपक्रम सुरू करण्यात आला. जिल्ह्यातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी आरोग्य, शिक्षण, रोजगार, कृषी या सर्व आयामांचा विचार करून प्रोजेक्ट उडाणची आखणी करण्यात आली. शिक्षणाकरिता एक गाव एक वाचनालय, समर वॉटर कॅम्प, स्टुडंट पोलिस कॅडेट प्रोग्राम, ऑपरेशन रोशनी व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ केंद्र अशा बहुआयामी कार्यक्रमांची सुरुवात या प्रोजेक्ट अंतर्गत गडचिरोली पोलिसांनी केली. याच उपक्रमाची दखल राज्यस्तरावर घेतली जात आहे. एकूण ११२ आश्रमशाळांमध्ये इयत्ता ५ ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेतील माहिती अवगत करून दिली. समर वॉटर कॅम्पमध्ये जवळपास जिल्ह्यातील १०८ विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले. विविध पर्यटन स्थळी विद्यार्थ्यांच्या सहली आयोजित केल्या. सोबतच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयोगी पडतील यासाठी विविध प्रशिक्षणाचे आयोजन केले. इयत्ता ८ वी व ९ वी मध्ये शिकणाऱ्या ३०० विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसांचे निवासी स्टुडंट पोलिस कॅडेट शिबिर अख्ख्या महाराष्ट्रात गाजले. कारण महाराष्ट्रात प्रथमच गडचिरोली पोलिसांकडून अशा शिबिराचा प्रयोग करण्यात आला. जिल्ह्यातील बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगार मिळावा यासाठी रोजगार मेळावे, ब्युटी पार्लर, शिवणकाम, मॅकेनिक आदी व्यवसायांचे प्रशिक्षण पोलिस दलाने आखले. या संपूर्ण उपक्रमांमुळे गडचिरोलीचे पोलिस दल राज्यभरात प्रसिद्धीच्या झोतात आले आहे. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनात गडचिरोलीची पोलिस भरती संपूर्ण राज्यात पारदर्शक म्हणून गाजली. या भरतीदरम्यान पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी कुठल्याही वशिल्यांना थारा न देता एकाही युवकावर अन्याय होऊ दिला नाही. या भरतीतही तांत्रिक उपक्रमांचा वापर करून कुठल्याही त्रुटी राहू नये यासाठी ते जातीने लक्ष ठेवून होते. त्यामुळेच गडचिरोली पोलिसाचा डंका अख्ख्या राज्यात गाजू लागला आहे. ▮

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# संविधान बचावच्या मुद्यावरून काँग्रेस अडचणीत

**श्यामकांत जहागीरदार**

लोकसभा निवडणुकीच्या आधी मोदी सरकार संविधान बदलण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत काँग्रेसने देशभर रान उठवले होते. या मुद्यावरून काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काश्मीर ते कन्याकुमारी अशी भारत जोडो यात्राही काढली होती. मोदी सरकार संविधान बदलण्याचा प्रयत्न करत असल्याचा बिनबुडाचा, खोडसाळ आणि धादांत खोटा आरोप राहुल गांधी सातत्याने करत होते. आता या मुद्यावरून काँग्रेसच अडचणीत आली आहे. संविधान बदलाच्या मुद्यावरून भाजपासाठी खोदलेल्या खड्ड्यात काँग्रेसच पडली आहे. काँग्रेसच्या एका नेत्याने आपल्या हाताने काँग्रेसला या खड्ड्यात ढकलले आहे. या खड्ड्यातून बाहेर पडणे काँग्रेससाठी आता सोपे नाही.

काँग्रेस संविधान बदलण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप भाजपाने केला नाही, तर काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्याने तसे संकेत दिले आहे. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी सरकारी ठेक्यात मुस्लिमांना चार टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली. धर्माच्या आधारावर कोणालाही आरक्षण देता येत नाही, याकडे पत्रकारांनी लक्ष वेधले असता, यासाठी जे जे आवश्यक आहे, ते ते बदल आम्ही करू, असे शिवकुमार यांनी म्हटले. मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी आम्ही संविधान बदलू, असे शिवकुमार यांनी स्पष्टपणे म्हटले नसले तरी त्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ तोच आहे. मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देण्याच्या मुद्यावर कर्नाटकातील काँग्रेसचे सरकार ठाम आहे आणि संविधानात बदल केल्याशिवाय मुस्लिमांना आरक्षण देता येणार नाही, हेही नक्की आहे. त्यामुळे राज्यातील मुस्लिमांना आरक्षण द्यायचे असेल तर काँग्रेसला संविधानात बदल करावाच लागेल, यात शंका नाही. विशेष म्हणजे गरजू लोकांना आरक्षण देण्यासाठी आतापर्यंत संविधानात डझनभरवेळा दुरुस्त्या करण्यात आल्या आहे. त्यामुळे शिवकुमार यांनी काँग्रेसचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे असल्याचे आपल्या विधानावरून दाखवून दिले आहे.

आतापर्यंत मोदी सरकार संविधान बदलण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप करत काँग्रेसने आकाशपाताळ एक करण्याचा प्रयत्न केला. या आरोपामुळे लोकसभा निवडणुकीत भाजपा काही प्रमाणात अडचणीत आली, हेही नाकारता येणार नाही. मात्र आता संविधान बदलण्याच्या मुद्यावरून भाजपाला अडचणीत आणणारी काँग्रेसच या मुद्यावरून अडचणीत आली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात या मुद्यावरून भाजपाने काँग्रेसला घेरले. संविधान बदलण्याचा काँग्रेसचा हा छुपा कार्यक्रम असल्याचा आरोपही भाजपाने केला. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी या मुद्यावरून काँग्रेसचा बचाव करण्याचा दुबळा प्रयत्न केला.

विशेष म्हणजे या मुद्यावर खडगे वगळता अन्य कोणी बोलल्याचे दिसले नाही. कोणीही संविधान बदलू शकत नाही, अगदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरही संविधान बदलू शकत नाही, असे खडगे म्हणाले. पण त्यावर लोकांचा विश्वास बसला नाही. कारण तोपर्यंत या मुद्यावरून काँग्रेसचे व्हायचे तेवढे नुकसान होऊन गेले होते. विशेष म्हणजे या मुद्यावर काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची प्रतिक्रिया समोर आली नाही.

काँग्रेसची सुरुवातीपासूनची भूमिका ही मुस्लिम तुष्टीकरणाचीच राहिली आहे. मुस्लिम तुष्टीकरणासाठी काँग्रेस कोणत्याही थराला जाऊ शकते, हे देशातील लोकांनी अनेक उदाहरणांवरून पाहिले आहे. त्यामुळे यावेळी कर्नाटकातील मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी काँग्रेस संविधानात बदल करणारच नाही, असे नाही. या मुद्यावर काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाची भूमिका शिवकुमार यांच्यापेक्षा वेगळी असती तर त्यांनी शिवकुमार यांच्यावर कारवाई केली असती, पण काँग्रेसच्या नेतृत्वाने आतापर्यंत त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही, त्यामुळे त्यांच्या भूमिकेशी काँग्रेसचे नेतृत्व सहमत असल्याचा अर्थ काढता येऊ शकतो. माझ्या विधानाचा विपर्यास करण्यात आला, असा खुलासाही शिवकुमार यांनी केला नाही, उलट मुस्लिमांना आरक्षण देण्याच्या आपल्या भूमिकेचा ते वारंवार पुनरुच्चार करत राहिले. याचाच अर्थ काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाला जे हवे तेच शिवकुमार बोलत आहे वा काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाची भूमिकाच ते मांडत आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

आपल्या देशात धर्माच्या आधारावर कोणालाच आरक्षण देता येत नाही. आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणाच्या मुद्यावर आरक्षण देता येते. देशात आताही मुस्लिम धर्मातील जवळपास ३६ जातींना सामाजिक मागासलेपणाच्या आधारावर संविधानातील १६(४) च्या तरतुदीनुसार ओबीसी वर्गातून आरक्षण दिले जात आहे. एखादा समाज मागासलेला आहे, असे जर वाटत असेल तर सरकारी नोकरीत सरकार त्या वर्गाला आरक्षण देऊ शकते.

सरकारी ठेक्यात मुस्लिमांना आरक्षण देण्याचा प्रकार हा कर्नाटकात पहिल्यादांच घडला नाही. २०१३ ते १८ या कार्यकाळात सत्तेवर असताना सिद्धरामय्या सरकारने सरकारी निविदात अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकांना ५० लाखापर्यंतची सूट देण्याचा निर्णय घेतला होता. २०२३ मध्ये सत्तेवर आल्यानंतर सिद्धरामय्या सरकारने ही मर्यादा २ कोटींपर्यंत वाढवली होती. त्यावेळी अनुसूचित जाती आणि जमातीतील आपल्या बांधवांच्या हितासाठी हा निर्णय घेतल्यामुळे त्यावेळी या निर्णयावर कोणी हरकत घेतली नव्हती. मात्र त्याच्याच आड लपत कर्नाटकातील काँग्रेसच्या सरकारने यावेळी सरकारी ठेक्यात मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे त्याला विरोध होणे स्वाभाविक होते.

मुस्लिम धर्मातील काही जाती आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक बाबतीत मागासलेल्या असतील तर त्यांना आरक्षण द्यायला कोणाची हरकत राहणार नाही, पण फक्त तुष्टीकरण करणे या एकाच मुद्यावर त्यांना आरक्षण दिले जात असेल तर तो प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. आपल्या राजकीय फायद्यासाठी एका धर्माचा वापर करणे आणि दुसऱ्या धर्माच्या लोकांवर अन्याय करणे मान्य करता येणार नाही. काँग्रेसचा इतिहास हा असाच आहे. काँग्रेसने आपल्या राजकीय फायद्यासाठी मुस्लिमांचे तुष्टीकरण केले तर हिंदू धर्मावर सातत्याने अन्याय केला. ताजा प्रकारही काँग्रेसच्या त्याच मानसिकतेतचा परिचायक आहे. या मुद्यावर काँग्रेसला आताच रोखले नाही तर काँग्रेस अन्य राज्यांतही असा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाही. ▮

९८८१७१७८१७

### गुढीपाडव्याला औषधाचे सेवन करावे

चैत्र महिना उन्हाळ्यात येतो आणि गुढीपाडवा चैत्र महिन्यातच असतो. उन्हाळ्याचा त्रास होऊ नये यासाठी एक औषध सांगितले आहे. पाडव्याच्या दिवशी या औषधाचे सेवन केल्यास त्याचा विशेष लाभ होतो. पाडव्याच्या दिवशी औषधाचे सेवन करण्यास जमले नाही तर ज्यांना उन्हाळ्याचा त्रास होतो त्यांनी नंतर सुद्धा हे औषध घेतल्यास चालू शकते. या औषधाचे महत्त्व सांगणारा एक संस्कृतमध्ये श्लोक आहे. याचा मराठीमध्ये अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

कडुलिंबाची कोवळी पाने, फुले, मिरे, हिंग, मीठ, कैरी, साखर आणि चिंच हे सर्व साहित्य एकत्र करून ते चांगले वाटून त्याचे मिश्रण तयार करावे आणि औषध म्हणून सेवन करावे. हे औषध तयार करताना त्यामध्ये कडुलिंबाची जुनी पाने घालू नये कारण त्यामुळे त्यातील औषधी गुणधर्म कमी होतो. यासाठी कोवळी पाने घेऊनच औषध तयार करून त्याचे सेवन करावे.

**वैद्य संध्या देशपांडे**/ नागपूर

### श्रमदानातून गणेश कुंडांची निर्मिती

येथून सहा महिन्यांनी गणपती बाप्पा येणार. त्यासाठी गणेशभक्तांची लगबग सुरू होणार. त्यापूर्वी पावसाळा सुरू झालेला असतो. उत्सवांबाबतच्या चर्चेत एक छान विचार मांडण्यात आला. गणपती विसर्जन हा एक पूर्ण दिवसभर, मध्यरात्रीपर्यंत चालणारा आणि थकवणारा उत्सव असतो. यात कार्यकर्तेही थकून जातात. गावोगावी मोठे तलाव किंवा नद्या नसतात. अशावेळी गावकऱ्यांच्या श्रमदानामधून गणेश कुंडांची निर्मिती होऊ शकते. गावाबाहेर पावसाचे पाणी जिथे साठवू शकतो अशा ठिकाणी गणेश कुंडांची निर्मिती व्हावी आणि विसर्जनाच्या वेळी ज्या लांबच लांब रांगा लागतात त्यांच्यापासून सुटका होईल.



विसर्जनानंतर हे गणेश कुंड बुजवून टाकता येतील किंवा गावासाठी त्याचा छान तलाव तयार होईल. त्या सभोवताल झाडे आणि फुलझाडे लावून एक रम्य जागा गावासाठी उपलब्ध होईल. श्रमदानातून हे सारे सहज शक्य आहे. आतापासून कामाला लागलो तर गणपती विसर्जनाच्या वेळी गावासाठी गणेश कुंड मिळेल आणि ती त्या गावाची ओळख ठरेल.

**डॉ. शरद सालफळे**/९४२२१३६०६७

## वाचक पत्रे

### आज शुभ वारुणी योग

आज वारुणी हा अत्यंत शुभ योग चालून येत आहे. जेव्हा फाल्गुन मास, वद्य पक्ष, त्रयोदशी तिथीला शततारका नक्षत्र असते तेव्हाच हा वारुणी योग होतो. ही त्रयोदशी तिथी आज रात्री एक वाजून ४२ मिनिटांनी सुरू होत असून ती उद्या रात्री ११ वाजून ३ मिनिटापर्यंत असल्याने व त्याबरोबरच शततारका नक्षत्रसुद्धा आज रात्री २ वाजून २९ मिनिटांनी सुरू होऊन उद्या रात्री बारा वाजून ३३ मिनिटांपर्यंत असल्याने हा शुभयोग घडून येत आहे. या योगावर गंगास्नान, दान, धर्म, जप, तप साधना इत्यादी धर्मकार्य किंवा सत्कार्य केल्यास त्याचे फळ १०० सूर्यग्रहणात मिळणाऱ्या एकत्रित फलासारखे लाभते हे शास्त्रवचन आहे. आपल्या अनेक जन्मातील पापांचा नाश करण्याचे सामर्थ्य या एकाच योगामध्ये असल्याने याचा लाभ सर्वांनीच घ्यावा असे वाटते. हा योग जेव्हा शनिवारी घडून येतो तेव्हा तो महावारुणी योग असतो. कोटी कुळाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य या एकाच योगामध्ये आहे.

**मोहनशास्त्री जलतारे**/९८२२७११७३३

### शासकीय योजना आर्थिक दुर्बलांपर्यंत पोहोचवा

केंद्र व राज्य सरकारकडून आर्थिक दुर्बल नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध प्रकारच्या योजना राबविल्या जातात. शासनाच्या योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी असतात, परंतु या योजनांचा लाभ पात्र लाभार्थी घेऊ शकत नाहीत, ही वस्तुस्थिती धक्कादायक आहे. सरकारच्या योजना गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न व प्रसिद्धीसाठी हजारो कोटी रुपये खर्च केले जातात. पण ज्या घटकांसाठी योजना असतात, त्या घटकांना योजनांचा लाभ मिळत नसल्याचे चित्र दिसत आहे. शासकीय विकास योजनेच्या माध्यमातून विविध घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट सरकार समोर असते. अनेक योजनांना मात्र सरकारी अधिकारी आणि कर्मचारी यांचे अपयश आडवे येते. योजनेची माहिती लाभार्थींपर्यंत न पोहोचल्याने लाभापासून ते वंचित राहतात. काही योजना फक्त कागदावर राहतात, काही योजनांची अंमलबजावणी होत असते, मात्र योजना प्रत्यक्ष लाभार्थींपर्यंत पोहोचत नाहीत. शासनाने योजना आखून त्या प्रत्यक्षात राबविण्याची जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे. योग्य माहिती नागरिकांना देणे गरजेचे आहे. सर्वसामान्य नागरिकांनी शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा यासाठी शासन, प्रशासनाकडून प्रयत्न होणे गरजेचे आहे. ▮

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पत्रकरास जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२७ मार्च -**

येथील पत्रकार दत्ता पाटील (रा. तळेगाव ता. देवणी) यांना दारूची बातमी छापल्याचा कारणा वरून जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी पत्रकार सवरक्षण कायद्यानुसार देवणी पोलिसात गुन्हा नोद करण्यात आला आहे.



या बाबतीत मिळालेली माहिती अशी की गेल्या आठवड्यात तालुक्यातील अवैध देशी दारू जप्त केल्याची बातमी दैं. देशन्नती या दैनिकात प्रकाशित झाली होती. याचा राग मनात धरून माझ्या मुलाची बदनामी करतो का म्हणुन आर्वाच भाषेत शिवागळ व परिवारास जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी देवणी पोलिसात पत्रकार सांवरक्षण कायद्यानुसार हनुमंत रंगराव घोनशे (रा. तळेगाव ता. देवणी) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतचा अधिक तपास पोलीस उपअधिक्षक याच्या कडून करण्यात येत आहे. या घटनेचा तालुका पत्रकार संघाकडून निषेध होत आहे.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### कर्तव्यदक्ष तलाठी रामलिंग पाटील यांचा सत्कार

**शिरूर अनंतपाळ, दि.२७ मार्च -**

शिरूर अनंतपाळ तलाठी सज्याचे तलाठी रामलिंग पाटील यांनी शिरूर अनंतपाळ सज्जाचा चार्ज घेतल्या पासून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केलेले काम, अवैध मार्गाने होणारी वाळू उपसा, मुरूम तसेच अनेक अवैध उत्खनन बंद केले. शासनाच्या अनेक योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवने व त्या माध्यमातून शेतकरी बांधवांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देणे तसेच शासनाच्या महसूल वसुली मध्ये जनतेला विश्वासात घेऊन व जनतेच्या समस्यांचे निवारण करून जास्तीत जास्त महसूल जमा करून शासनाला देणे या सर्व कार्याची दखल घेऊन लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा घुले यांच्या हस्ते शिरूर अनंतपाळचे तलाठी रामलिंग पाटील यांचा गौरव करण्यात आला होता. त्याबदल तलाठी रामलिंग पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक सुधीर लखनगावे, प्रगतिशील शेतकरी राम कोयले, मनोज बिराजदार, संभा सावंत, तानाजी वलांडे, ज्ञानोबा लोखंडे, विश्वनाथ हांद्राळे आदी उपस्थित होते.

### संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे दोन विद्यार्थ्यां नवोदय पात्र

**अहदमपूर, दि.२७ मार्च -**

येथील संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या अमृता जयपद्म वजीर, सार्थक दिगंबर मेंडके या दोन विद्यार्थ्यांची




लातूरच्या जवाहर नवोदय विद्यालयात शहरी भागातून प्रवेशासाठी निवड झाली आहे. या परीक्षेला ग्रामीण भागातून ८० टक्के व शहरी भागातून २० टक्के जागा असतात. शहरी भागातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना सविता पाटील, प्राजक्ता भोसले, शारदा तिरुके यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष गणेश दादा हाके-पाटील, सचिव प्राचार्या रेखाताई हाके-तरडे, उपाध्यक्षा ॲड. मानसी हाके, संस्था समन्वयक कुलदीप भैय्या हाके, अमरदीप हाके, मुख्याध्यापक आशा रोडगे, मुख्याध्यापक मीना तोवर सह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

### बोरोळ येथे ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त शिव सप्ताहाचे आयोजन

**देवणी, दि.२७ मार्च -**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षा निमित्त तालुक्यातील बोरोळ येथे दिं २८ मार्च ते दिं ३ एप्रिल या कालावधीत शिव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. शिव सप्ताहानिमित्त संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत शिवचरित्रांची व्याख्यानमाला आणि सकाळी ८ ते १० या वेळेत ग्राम गीतावाचन करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रमाचे आयोजन श्री संत लक्ष्मणनाथ भीमनाथ महाराज मठ देवस्थान येथे जिल्हा परिषद प्रशाला बोरोळ आणि कै. यशवंतराव चव्हाण मा. व उच्च माध्यमिक विद्यालय बोरोळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. तरी हजारो शिव प्रेमींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सर्व शिव भक्त आणि ग्रामस्थांनी केली आहे.



### ओंकार पवार यांचा म. गांधी महाविद्यालयात सत्कार

**अहमदपूर, दि.२७ मार्च -**

महात्मा गांधी महाविद्यालयाचा वाणिज्य शाखेत बी कॉम तृतीय वर्षात शिकत असलेला विद्यार्थी पवार ओंकार वैजनाथ याचे पुणे महानगर पालिका परिवहन महामंडळ पुणे येथे वाहक या पदावर नुकतीच नियुक्ती झाली. त्याबद्दल विचार विकास मंडळाचे अध्यक्ष ॲड किशनराव बेंडकुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव सुरेशराव देशमुख, प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ.एस.आर शेळके, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.व्ही.पी. शेळके, प्रा. वर्षा पेठे, प्रा. कोतवाड उपस्थित होते.

### अभियंत्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन

**तुळजापूर, दि.२७ मार्च -**

येथील तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात स्थापत्य विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या शंभर दिवसांचा सात कलमी कृती कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागीय तुळजापूर प्रशिक्षण शिबिर अंतर्गत उपविभागातील अभियंत्यांसाठी करिता सर्व दि.२६ मार्च रोजी डव्हांसड वेस्ट वॉटर ट्रीटमेंट व मिक्स्डि ऑरख्यानिक कंपोस्ट इन २४ अवर बाय कंपोस्ट मशीन या विषयावर स्थापत्य विभाग प्रमुख प्रा. दिपक पौळ यांनी व्याख्यान व प्रात्यक्षिक सादर केले.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निषेधार्थ निटूर येथे शोले स्टाईल आंदोलन

**▶▶ रखडलेली पाणी पुरवठा योजना सुरु करण्याची आंदोलकाची मागणी... ▶▶ पाणी पुरवठा सुरु नाही झाल्यास तीन एप्रिल रोजी रास्ता रोको व गाव बंद आंदोलनाचा इशारा...**



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२७ मार्च -**

तालुक्यातील निटूर येथील गेल्या तीन वर्षांपासून रखडलेली पाणी पुरवठा योजना तात्काळ सुरु करावी. पाईप लाईनसाठी रस्ता खोदण्यात आल्याने खराब झालेल्या रस्त्याची दुरुस्ती तात्काळ करावी या व इतर मागणीसाठी आज निटूर च्या सरपंच व ग्रामस्तानी शोले स्टाईल आंदोलन केले.

येत्या तीन एप्रिल पर्यंत जर पाणी पुरवठा सुरु नाही झाला तर रास्ता रोको व गाव बंद आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

सलग दोन तास झालेल्या या आंदोलनात ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. निटूर (ता. निलंगा) येथील सर्व घरांना शुद्ध पाणी मिळावे या हेतूने केंद्र सरकारने तीन वर्षांपूर्वी दहा कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर केली खरी मात्र गेल्या तीन वर्ष्यापासून ही योजना संबंधित कंत्राटदार व त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे कार्यान्वित झाली नाही.

त्यामुळे नागरिकांचे पाण्यासाठी हाल होतं आहेत. दरम्यान या संदर्भात निटूर ग्राम पंचायतने अनेक वेळा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाला पाणीपुरवठा योजना पूर्ण करावी असा लेखी पत्रव्यवहार केले.

परंतु संबंधित कार्यालयाने कसलीच दखल घेतली नाही. त्यामुळे आज निटूरच्या सरपंच प्रतिभा अनिल सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थानी भर उन्हात दोनं तास आंदोलन केले. निटूर मध्ये पाईपलाईनच्या नावाखाली गावातील अनेक रस्ते उकरण्यात आले. त्यामुळे रस्त्यावरून चालणे मुश्किल झाले आहे. पाईप लाईन बुजवल्या नंतर त्यावर पॅच वर्क ही केले नाही. त्यामुळे तीन वर्षांपासून नागरिकांचे हाल होत आहेत. पाणी पुरवठा प्रशासनाच्या या तुघलकी कारभारा विरोधात

निटूर (ता. निलंगा) येथे झालेल्या आंदोलनास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अभियंता खरोसेकर, निलंगा पं.स. पाणी पुरवठा विभागाचे कुंभार, निटूरचे तलाठी कुंभार, तसेच इतर अधिकाऱ्यांनी भेट देऊन निवेदन स्वीकारले. तसेच येत्या तीन एप्रिल पर्यंत सर्व गावात उच्च दाबाने पाणी पुरवठा सुरु नाही झाले. तसेच गावातील रस्त्याची दुरुस्ती नाही झाली तर निटूर मध्ये जीवन प्राधिकरणच्या विरोधात रास्ता रोको व गाव बंद आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आले.



आज सकाळी सरपंच प्रतिभा अनिल सोमवंशी तसेच उपसरपंच शिवराज सोमवंशी, ग्रामपंचायत सदस्य संदीप पाटील, दिनकर कवडे, श्रावण शिंदे, शिवाजी बाबर, शिवाजी व्यवहारे, तसेच महिला ग्रामपंचायत सदस्य यांनी प्रशासनाचा निषेध म्हणून शोले स्टाईल आंदोलन केले.

यावेळी महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चाकूर न.पं.च्या उपनगराध्यक्षावर १५ नगरसेवकांचा अविश्वास प्रस्ताव दाखल



**भाजप, राष्ट्रवादी व काँग्रेसचे नगरसेवक एकत्र...**

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२७ मार्च -**

चाकूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अरविंद बिराजदार यांच्यावर बुधवारी मुख्याधिकारी प्रतिक लंबे यांच्याकडे नगरपंचायतीच्या १५ सदस्यांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. गेल्या तिन वर्षांपूर्वी चाकूर नगरपंचायतीची निवडणूक झाली होती. यामध्ये प्रहारचे ६, भाजपचे ३, राष्ट्रवादी काँग्रेसचे ५ आणि काँग्रेसचे ३ नगरसेवक निवडून आले होते. त्यावेळी प्रहार आणि भाजप एकत्र येऊन प्रहारचे कपील माकणे नगराध्यक्ष झाले तर भाजपचे अरविंद बिराजदार उपनगराध्यक्ष झाले होते.

२६ मार्च रोजी चाकूर नगरपंचायतीचे भाजप, राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे १५ नगरसेवक एकत्र येऊन उपनगराध्यक्ष यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी प्रतिक लंबे यांच्याकडे दाखल करण्यात आला आहे. यावेळी उपनगराध्यक्ष हे आम्हाला विश्वासात घेत नाहीत व या पदासाठी वेळ देऊ शकत नसल्यामुळे आम्ही सदरील प्रस्ताव दाखल करत आहोत. अशा आशयाचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.

त्या प्रस्तावावर १५ नगरपंचायत सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

त्यामध्ये अब्दुल करीम गुळवे, मिलींद महालिंगे, भागवत फुले, साईप्रसाद हिप्पाळे, मजमिल सय्यद, शबाना सय्यद, ज्योती स्वामी, गंगुबाई गोलावार, गोदावरी पाटील, सुजाता रेड्डी, शुभांगी कसबे, वैशाली कांबळे, हिरकणा लाटे, सय्यद शाहीनबानो, अभिमन्यू धोंडगे यांच्या या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या आहेत.

सहजपणे कुठेही उपलब्ध होणारा उपनगराध्यक्ष म्हणून लोकांच्या सेवेत मी कायम सेवा करीत आहे. भेटेल त्या ठिकाणी काम करणारा उपनगराध्यक्ष म्हणून माझी चर्चा असताना मला न सांगता आकसापोटी,सुड भावनेने व राजकीय हेतू साध्य करण्यासाठी, हा अविश्वास प्रस्ताव दाखल करीत असल्याचे उपनगराध्यक्ष अरविंद बिराजदार यांनी सांगितले.

## उच्च सुरक्षा नंबरप्लेटचे दर माफक व प्रक्रिया सुलभ करावी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२७ मार्च**

नवीन एच.एस.आर.पी. HSRP नंबर प्लेटचे दर माफक करून नंबर प्लेटची प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी ग्राहकतीर्थ बिंदू माधव जोशी प्रणित ग्राहक पंचायत महाराष्ट्र संस्थेच्या शाखेने व जिल्हा संघटक तथा ग्राहक संरक्षण परिषदेचे शासन नियुक्त सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर व ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य शाखा अतनूरच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ईमेलव्दारे केली आहे.

१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी एच.एस.आर.पी.(HSRP) बसवण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचे आणि मुद्दत वाढीचे ग्राहक पंचायत महाराष्ट्र संस्थेने स्वागत केले आहे.

वरील विनंतीवजा मागणीवर सकारात्मक विचार होऊन योग्य कार्यवाही व्हावी, अशी विनंती बालासाहेब शिंदे अतनूरकर, प्राचार्य व्ही.एस. कणसे, प्रा. अविनाश पाटील, प्रा. अमित कवठाळे, भागवत धुमाळ, संध्या शिंदे, गोगलताई धुमाळ, बिराजदार, रूक्मीण सोमवंशी तसेच हणमंत साळुंके, प्रविण सोमवंशी, एस.जी. शिंदे, मयुरी शिंदे, व्यंकटेश शिंदे, रामदास जाधव, सुनिता भंडारे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## असू येथे शासकीय योजनेचा लाभ देण्यासाठी शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ मार्च -**

असू येथील शासन निर्देशाप्रमाणे शंभर दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांनुसार शासकीय अधिकारी कर्मचारी यांच्या गाव भेट दौरा शिबीर आज आसू येथील दत्त मंदिरात पार पाडण्यात आले या शिबिरामध्ये या मंडळातील लोक हजर होते.विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

सामाजिक अर्थसाहाय्य योजना लाभार्थी आधार प्रमाणीकरण ३०,फॉर्मर आयडी ग्रीस्टॅक कार्ड काढणे ३६, आधार कार्ड मोबाईल लिंक करणे१६, शिधापत्रिकांची केवायसी करणे ५८ असा लाभ, शेतकरी आत्महत्या दीड लाखांचे अनुदान वाटप करण्यात आले, तक्रारी फेरफार मधील निकालाची नक्कल देण्यात आली.

शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष परीश्रम ग्राम विकास अधिकारी भोसले नागटिळक धुमाळ खंबायत, वाळके, कोकाटे व मंडळाधिकारी सुरवसे व आसु गावचे सरपंच अनिता राऊत, उपसरपंच शशिकांत खुने, श्रावण गणगे, महादेव मार्कड, रघुनाथ माने ग्रामपंचायत अधिकारी भुजबळ, सागर बुरंगे, शिवाजी यशवद, दशरथ यशवद यांनी परिश्रम घेतले.

## चिंच फोडण्यातून महिलांना मिळतोय रोजगार

**तभा वृत्तसेवा / उदयकुमार पाठक**
**रेणापूर, दि.२७ मार्च -**

गेल्या काही दिवसापासून रेणापूर तालुका व पानगांव परिसरात चिंच झोडपणे. गोळा करणे आणि फोडणे यातून पुरुषासह महिलांना रोजगार उपलब्ध झाला असून त्यातून मिळालेल्या पैशातून घर खर्चासाठी महिलांना आर्थिक हातभार लागत आहे.

सध्या रेणापूर तालुक्यासह पानगाव परिसरात यंदा चिंचेचे चांगले उत्पादन निघत आहे. चिंच व्यापारी झाडाचा तोर बघून झाडाची किंमत ठरवत असतात. त्यांना माहित असते की या झाडापासून आपल्याला किती फायदा होऊ शकतो. आज रोजी चिंच परीपक्व झाली असल्याने चिंच झोडपणे. गोळा करणे आणि त्याची फोडणी करून गर आणि चिंचोका बाजारात नेण्यासाठी व्यापाऱ्याची धावपळ उडाली आहे.



चिंच झोडपण्यासाठी व्यापारी पुरुषांची तर गोळा करण्यासाठी आणि चिंच फोडण्यासाठी महिलांची मदत घेत आहेत चिंचेला सध्या ८२०० ते १३००० पर्यंत भाव लागत आहे. बाजारभावात घसरण होण्या अगोदरच परिपक्व झालेली चिंच झोडपून गोळा करून आणि फोडून बाजारात नेण्याची व्यापाऱ्यांना घाई झाली आहे. सर्व व्यापारी महिलांना घरपोच चिंच फोडण्यासाठी आणून देत आहेत. सध्या उन्हाचे चटके बसत असल्याने महिला पण पहाटेचे शेत शिवारात जाऊन रवी धान्य पिके आणि भाजीपाला व इतर कामे करून उन्हामुळे लवकर घरी येत आहेत. आणि दुपारच्या सावलीत रिकाम्या वेळेत चिंच फोडणीचे काम करत आहेत. महिलांना फोडलेल्या चिंचे मागे २० रुपये किलो मजुरी मिळत आहे.

एक महिला साधारण दिवसाला २० किलो चिंच फोडत आहे. त्यांना दिवसाकरता केवळ चिंच फोडणीतून ३०० ते ४०० रुपये मजुरी मिळत आहे. चिंच फोडणीतून महिलांना रोजगार मिळत असल्याने घर खर्च साठी आर्थिक हातभार लागत आहे.

## एकनाथ शिंदे यांच्या लोकाभिमुख निर्णयामुळेच राज्यात पुन्हा महायुती सरकार : शिवाजी माने

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२७ मार्च -**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांच्या लोकाभिमुख निर्णयामुळेच राज्यात प्रचंड बहुमताचे महायुती सरकार राज्यात आले असल्याचे मसलगा येथील शिवसेना शाखेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना शिवसेनेचे लातूर जिल्हा प्रमुख शिवाजीराव माने यांनी सांगितले.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना एकनाथराव शिंदे यांनी महिलांसाठी लाडकी बहीण, महिलांना बस अर्धे तिकिट, एक रूपयात पिकविमा योजना, नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना हेक्टरी मदत दुप्पट, शेतकऱ्यांना पीएम किसान च्या धर्ती नमो शेतकरी योजना, हजारो रूग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत, लाडका भाऊ योजना अशा अनेक लोकाभिमुख योजना प्रभावीपणे राबविल्यामुळेच राज्यात प्रचंड बहुमताचे महायुती सरकार राज्यात आले. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेवर एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या सेवेसाठी शिवसैनिक सदैव तत्पर राहील अशी ग्वाही शिवसेना लातूर जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी दिली.

मसलगा येथील शिवसैनिक माधवराव मोहिते यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या शाखेची स्थापना जिल्हा प्रमुख शिवाजीराव माने यांच्या हस्ते फित कापुन फलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी शिवसेनेच्या लातूर संपर्क प्रमुख रंजनाताई कुलकर्णी, उपजिल्हा प्रमुख सुधीर पाटील, महिला आघाडीच्या लातूर जिल्हा प्रमुख अर्चनाताई बिरादार, युवासेनेचे लातूर जिल्हा प्रमुख युवराज वंजारी, औसा तालुका प्रमुख तानाजी सुरवसे, निलंगा तालुका प्रमुख भगवान जाधव, विष्णु साबदे, बाबुराव शेळके, किरण सोमवंशी, बाबु दंडिमे, सोमेश्वर लक्षेट्टे, निलंगा उप तालुका प्रमुख नागमनी म्हेत्रे, निलंगा शहर प्रमुख बबीता कोरके आदी शिवसेनेच्या प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. यावेळी श्रीमंत जाधव, चंदर पवार, धोंडीराम पिंड, राजेश पिंड, विशाल पाटील, ओम बिरादार, हाजु सय्यद, किशोर तोरखडे, संजय तेलंगे, हारी पिंड, महेश मोहिते, भास्कर शिंदे, नवनाथ नरहारे, संजय घोडके, गफूर सय्यद, वैभव पाटील, शांतेश्वर तेलंगे, सावित्रीबाई मोहिते, शोभा तेलंगे, सोजरबाई रणदिवे आदींसह शिवसैनिक, गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ॲडव्हान्स कोर्सचे उद्घाटन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ मार्च -**

श्यामलाल स्मारक कला, क्रीडा व विज्ञान अकॅडमी द्वारा स्पोकन इंग्लीश कोर्स, मराठी हस्ताक्षर कार्यशाळा, मोफत फाऊंडेशन समर कलालेस ४ थी, ५ वी ८ वी व १० वी, तसेच ५ वी ते ९ वी पर्यंत इंग्रजी विषयाचे अभ्यासक्रम अशा विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य, प्रमुख पाहुणे भारतीय जनता पार्टीचे माजी अध्यक्ष तथा उसतोड कामगार समितीचे प्रमुख गोविंद केंद्रे, शालेय समितीचे सदस्य पंडीतराव सुकनीकर, बिरादार कुलकर्णी, श्यामार्य कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण भोळे, यामलाल माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक भारत खंदारे व श्यामलाल प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक उगिले, पर्यवेक्षक विजयकुमार बैले, राहुल लिमये, शिक्षक, शिक्षिका विद्यार्थी या सर्वांच्या उपस्थितीत दिपप्रज्वलन करून उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्याच्या सिंचन अनुशेषासाठी आ. मुटकुळेंनी घेतली राज्यपालांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मार्च**
हिंगोली जिल्ह्यातील सिंचन अनुशेषाचे प्रस्तावीत कामे तसेच सुरू असलेली प्रकल्प यांना गती देण्यासाठी विशेष बैठक बोलावण्यात यावी अशी विनंती भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी राज्याचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी वसमतचे आ. राजू नवघरे यांचीही उपस्थिती होती.
आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी सतत पाठपुरावा केला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष तत्कालीन राज्यपालांनी मंजूर केला. त्यानंतर बंधारे व इतर सिंचनाची कामे सुरू झाली आहेत परंतु सद्यस्थितीत काही कामे संथगतीने चालू असून काही कामे सुरू होणे गरजेचे आहे. सिंचनामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्यामुळे पुन्हा एकदा भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे आणि वसमतचे आ. राजू नवघरे यांनी दि २६ मार्च रोजी मुंबई येथे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी जिल्ह्याचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी राज्यपालांना निवेदन सादर केले. यावेळी आ. मुटकुळे यांनी हिंगोलीतील सिंचन प्रकल्पाची सविस्तर माहीती राज्यपालांना दिली.
जिल्ह्यात शेतीला पाणी न मिळाल्याने शेतकऱ्यांची पिके धोक्यात येत असून त्यामुळे आत्महत्याचे प्रमाण वाढत आहे.
जिल्ह्याचे सिंचन केवळ ११ टक्के जमिनीसाठी आहे. त्यानंतर तत्कालीन राज्यपाल विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंगोली जिल्ह्यासाठी १५ हजार हेक्टर सिंचन अनुशेषाला मंजुरी दिली. परंतु त्या पध्दतीने सिंचनाची कामे जिल्ह्यात झाली नाहीत. जिल्ह्यातील शेतीला पाणी मिळाल्यास शेतकऱ्यांना त्याचा मोठा दिलासा मिळणार आहे. आत्महत्येचे प्रमाणही कमी होणार आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या सिंचन प्रकल्पासंदर्भात विशेष बैठक बोलावून सिंचनाचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी प्रकल्पांना मंजुरी आणि निधीचे वितरण तत्काळ करावे अशी मागणी यावेळी आ. मुटकुळे, आ. नवघरे यांनी राज्यपालांकडे केली. राज्यपालांनी यासंदर्भात लवकरच सकारात्मक निर्णय ९घेवून जिल्ह्याच्या सिंचन अनुशेषाबाबत बैठक घेण्याचे आश्वासन दिले. यावेळी भाजप तालुकाध्यक्ष हिम्मत राठोड, शामराव देशमुख, भागवतराव मुंढे, छत्रपती गडदे आदींची उपस्थिती होती.

# कळमनुरी वकील संघाचे एक दिवशीय काम बंद आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मार्च**
कळमनुरी पोलिस ठाण्यात फिर्यादीसोबत तक्रार देण्यासाठी गेलेले वकील ॲड रवी शिंदे यांना पोलिस अधिकाऱ्यांनी धक्काबुक्की करत अपमानास्पद वागणुक दिल्याच्या निषेधार्थ कळमनुरी वकील संघाच्यावतीने एक दिवस न्यायालयीन कामकाज बंद आंदोलन करीत संबंधितांवर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.
कळमनुरी येथील ॲड रवी शिंदे हे दि २५ मार्च रोजी फिर्यादीसोबत कळमनुरी पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले होते. यावेळी पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांनी अश्लील भाषेत ॲड शिंदे यांना शिवीगाळ करून अपमानास्पद वागणुक देत पोलिस ठाण्याबाहेर हाकालून दिले. तसेच सहाय्यक निरीक्षक रघुनाथ शेवाळे व हनुमंत भिंगारे यांनी ॲड शिंदे यांना न्यायालयात वकीली करायचे हे पोलिस ठाणे आहे असे म्हणत धक्का मारला. तसेच ॲड शिंदे यांच्याविरोधात खोटा अदखलपात्र गुन्हा दाखल केला. या घटनेचा आज वकील संघाच्यावतीने जाहीर निषेध करीत एक दिवसाचे न्यायालयीन कामकाज बंद पाळण्यात आला.
यावेळी उपविभागीय अधिकारी यांना वकील संघाने निवेदन सादर केले. त्यामध्ये पोलिस निरीक्षक मोहन भोसले, सहाय्यक निरीक्षक रघुनाथ शेवाळे, जमादार हनुमंत भिंगारे यांच्याविरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, ॲड रवी शिंदे यांच्याविरूध्द अदखलपात्र गुन्हा मागे घेण्यात यावा अन्यथा वकील संघाच्यावतीने तीव्र आंदोलनाचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर ॲड एल एल सिरसाट, ॲड शाकेर सिद्दीकी, ॲड डी एस पाईकराव, ॲड लुगडे पाटील, ॲड रवि शिंदे, ॲड सतीश पंडीत, ॲड मोहमद एकबाल, ॲड अमोल डिग्गीकर, ॲड मल्हारी खोकले, ॲड सुनील घोंगडे ॲड डी पी सोनुले, ॲड सुरेश गरड, ॲड कुणाल इंगोले, ॲड व्ही एच खंदारे, ॲड अरूण दांडेकर, ॲड देवानंद पंडीत, ॲड शेख शकील ॲड एम एन खिल्लारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोलीत क्रिटीकल केअर मेडीसीन अभ्यासक्रमास मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मार्च**
हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात क्रिटीकल केअर मेडीसीन अभ्यासक्रमाला मान्यता मिळाली असून दरवर्षी एमडी मेडीसीन अभ्यासक्रम पूर्ण झालेल्या चार डॉक्टरांना प्रवेश घेऊन हा अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. त्यातून हिंगोलीच्या महाविद्यालयात चार एमडी डॉक्टर आरोग्य सेवेसाठी उपलब्ध होणार आहेत.
हिंगोली येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व्हावे यासाठी हिंगोलीतील नागरिक, लोकप्रतिनीधी, व्यापारी, पत्रकार यांनी पाठपुरावा केला होता. त्यामुळे हिंगोलीचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चालू शैक्षणिक वर्षापासून सुरू झाले असून याठिकाणी १०० विद्यार्थ्यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे. त्यामुळे आरोग्य क्षेत्रात हिंगोली जिल्ह्याने पुढे पाऊल टाकले आहे. या ठिकाणी एमडी मेडीसीन अभ्यासक्रम पूर्ण झालेल्या डॉक्टरांसाठी क्रिटीकल केअर मेडीसीन हा अभ्यासक्रम उपलब्ध होण्यासाठी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ चक्रधर मुंगल यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांच्याकडे पाठपुरावा केला होता.
त्यानंतर विद्यापीठाने आवश्यक बाबींची पडताळणी करून एक वर्षाचा क्रिटीकल केअर मेडीसीन या अभ्यासक्रमाला मान्यता दिली आहे. आयसीयूमध्ये काम करणाऱ्या डॉक्टरांसाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे. दरवर्षी चार डॉक्टरांना या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दरवर्षी चार एमडी मेडीसीन अभ्यासक्रम पूर्ण केलेले डॉक्टर्स उपलब्ध होणार असून त्यामुळे गंभीर आजारी रूग्णांना त्यांच्या मार्फत तातडीची आरोग्य सेवा मिळणे शक्य होणार आहे. दरम्यान जून-जुलै महिन्यापासून या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे वैद्यकीय महाविद्यालयाच्या सुत्रांनी सांगितले आहे. आणखी काही अभ्यासक्रमासाठी पाठपुरावा सुरू असल्याचेही सुत्रांनी सांगितले आहे.



**हिंगोली- आगामी सण, उत्सवानिमित्त येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, आ. तान्हाजीराव मुटकुळे, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्यासह शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### ऑलंपियाडमध्ये केदार पतंगेचे यश



हिंगोली- केदार अश्विन पतंगे हा ए बी एम स्कूल मधील इयत्ता पहिली मधील विद्यार्थी असून नुकत्याच जाहीर झालेल्या एमटीएस ऑलंपियाड परीक्षेच्या निकालामध्ये तो सुवर्णपदक विजेता ठरला आहे. केदार हा महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर जिल्हा लातूर येथील माजी प्राचार्य डॉ. बळीराम पानपट्टे यांचा नातू आहे. या यशाबद्दल केदारचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. याबद्दल आई रोहिणी पतंगे, वडील आश्विन पतंगे, मामा डॉ. प्रकाश अंभोरे, आत्या मंजुषा अंभोरे, आजी वच्छलाबाई पतंगे, एबीएम शाळेचे अध्यक्ष दिलीपराव बांगर व प्राचार्य रॉबिन वर्गीस यांनी केदारचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### माजी सैनिक महिलांनी भरतीचा लाभ घ्यावा

हिंगोली- १३६ इन्फट्री महार बटालियन टीए इको मध्ये माजी सैनिक तथा पर्यावरण मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्य वन विभागामधून स्वेच्छा सेवानिवृत्त घेतलेल्या महिलांसाठी दि. २१ एप्रिल ते २३ एप्रिल, २०२५ या कालावधीत एसआरपीएफ कँम्र ग्राउंड धुळे सिटी, धुळे येथे भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. एमओईएफ आणि सीसी आणि राज्य वन विभागाचे सेवानिवृत्तांनी १३६ इन्फंट्री बटालियन टीए इको, महार मध्ये सहभागी होण्यासाठी स्वयंसेवा करणारे सर्व पात्र उमेदवार दिलेल्या वेळापत्रकानुसार दि. २१ एप्रिल ते दि. २३ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ५.३० वाजता एसआरपीएफ कँम्प ग्राउंड धुळे सिटी, धुळे येथे शारीरिक फिटनेस चाचणी सुरु होणार आहे. शिपाई जनरल ड्यूटीचे ४४ पदे केवळ महाराष्ट्रातल्या माजी सैनिक तथा माजी सैनिक महिलांमधून भरण्यात येणार आहेत. तर लिपिक-६, स्वयंपाकी-०१, हेयर ड्रेसर-०१, मेसकीपर-०१, स्टेवर्ड-०१ आणि ब्लॅकस्मिथ-०१ ही पदे संपूर्ण भारतातील माजी सैनिक क्लार्क किंवा माजी सैनिक ट्रेड्समेनमधून भरण्यात येणार आहेत. या भरतीसाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त माजी सैनिकांनी अटी व पात्रता पाहून भरतीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयास ९०२१२०८८२२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### ४५ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४५ वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाने कार्यवाही करीत त्यांच्याकडून २८ हजार ५०० रूपयांचा दंड वसूल केला आहे. पोलिस अधीक्षक कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबवीत चार जुगार अड्ड्यावर पथकांनी छापे मारून जुगाराच्या साहीत्यासह काही रक्कम जप्त करीत आरोपींविरूध्द जुगार कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# व्हाईस ऑफ मिडीयाच्या तालुका अध्यक्षपदी शिवाजी घुगे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मार्च**
व्हाईस ऑफ मीडियाच्या तालुका अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक प्रक्रिया संपन्न झाले असून यामध्ये तालुका अध्यक्षपदी शिवाजी घुगे यांची तर तालुका उपाध्यक्षपदी शिवाजी थोरात यांची दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली.
व्हाईस ऑफ मीडिया ही पत्रकारांची एक मोठी संघटना असुन या संघटनेमार्फत, पत्रकाराच्या विविध समस्या विषयी आवाज उठविला जातो यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील पत्रकार बांधवांचा मोठ्या प्रमाणात समावेश असून यामध्ये काम करणाऱ्या अनेक इच्छुक पत्रकारांना विविध जबाबदाऱ्या देण्यात येतात. बैठकीत हिंगोली तालुकाध्यक्षपदी बिनविरोध शिवाजी घुगे, उपाध्यक्षपदी शिवाजी थोरात यांची निवड करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर उंडाळ, जिल्हाउपाध्यक्ष गजानन वाणी, कार्याध्यक्ष रमेश चंडके, कार्याध्यक्ष नंदकिशोर कांबळे, जिल्हासरचिटणीस सचिन कावडे, प्रसिद्धीप्रमुख बाबाराव धवसे, संघटक शिवाजी लोंढे, सदस्य शेख सत्तार अहमद, यांची उपस्थिती होती यामध्ये, सचिव पदी कैलास खिल्लारे, सहसचिव पदी भीमराव बलखंडे, कोषाध्यक्ष सुनील केंद्रे, प्रसिद्धी प्रमुख पदी बाबाराव धवसे,संघटक पदी बद्रीनाथ गलंडे, शिवाजी लोंढे, व पिराजी वसू, अर्जुन पवार, मदन बियाणी, डॉ.संतोष गावंडे, बालाजी सरकटे, गजानन कानेड, सुनील ईगंळे, श्रीकांत घुगे, राजकुमार धुळे, सय्यद अहमद सय्यद रसूल, रमेश आढळकर, अरविंद सावळे गंगाधर मस्के, सुरेश गडदे, यांच्या सुद्धा नियुक्त करण्यात आल्या या नियुक्ती विषयी जिल्हाध्यक्ष यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले

# औंढा नागनाथ येथे राष्ट्रवादीची बैठक कार्यकर्त्यांच्या समस्यांचे निराकरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मार्च**
औंढा नागनाथ शासकीय विश्राम गृहात २७ मार्च रोजी दुपारी दोन वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( अजित पवार) पक्षाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते .या बैठकीस वसमत विधानसभा राष्ट्रवादीचे आमदार राजू नवघरे उपस्थित होते.
या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सदस्य नोंदणी संदर्भात विशेष सूचना कार्यकर्त्यांना देण्यात आल्या तसेच जनता दरबार घेऊन वसमत विधानसभेतील कार्यकर्त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. या बैठकीस राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बि डी बांगर, महिला जिल्हाध्यक्ष कांचन शिंदे, युवा जिल्हाध्यक्ष आदित्य आहेर, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष गौतम दवणे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष असद कादरी, औंढा तालुकाध्यक्ष संजय दराडे, युवा तालुकाध्यक्ष गोपाळ मगर, उपसभापती बबनराव राखोंडे, संचालक भानुदास गीते, प्रवीण टोम्पे गजानन सांगळे, दतराव कदम यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते. बैठकीचे प्रस्तावना व सूत्रसंचालन संजय दराडे तर आभार आदित्य आहेर यांनी मानले.

# हिंगोलीतील कॅफे बनले लव पॉईंट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मार्च**
शहरातील शास्त्री नगर भागात एका तपासासाठी सीसीटीव्ही कॅमेरे तपासत असतांना एका कॅफेमध्ये एक जोडपे संशयास्पद हालचाली करतांना सीसीटीव्ही मध्ये आढळल्यानंतर पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांनी संबंधीत कॅफे मध्ये जाऊन त्यांचे आधार कार्ड तपासले असता त्यांचे आडनाव वेगवेगळे आढळले. त्यानंतर पोनि पाडळकर यांनी तरूणाला ताब्यात घेऊन त्याच्या कुटुंबियांना बोलावून त्याला समज दिली.
शहरातील सॅक्रेड हार्ट इंग्लीश स्कुलसमोर गुरूवारी एका गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर गेले होते. याठिकाणी असलेले सीसीटीव्ही फुटेज तपासत असतांना त्यांना कॅफेमध्ये एक जोडपे संशयास्पद हालचाली करतांना आढळून आले. त्यानंतर पोनि पाडळकर यांनी तत्काळ कॅफे चालकास बोलावून याबाबत विचारणा केली. शहरात अकोला बायपास येथील कॅफेमध्ये अनेक तरूण-तरूणीदुपारच्यावेळी येऊन बसत आहेत. तसेच रात्री उशिरापर्यंत हे कॅफे सुरू असतात. करीत असल्याचे दिसत आहे. या कॅफेमुळे अनेक तरूणी प्रेमाच्या जाळ्यात अडकत असून याचे दुष्परिणाम या तरूणींना भविष्यात भोगावे लागत आहेत. कॅफेच्या नावाखाली अशा प्रकारे तरूणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून विचित्र प्रकार घडत आहेत. या कॅफे चालकांवर कारवाई करून त्यांची नियमित तपासणी करण्याची मागणी होत आहे.

# २० मे च्या मोर्चासंदर्भात सकल मातंग समाजाची हिंगोलीत बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मार्च**
सकल मातंग समाजाची शासकीय विश्रामगृह येथे माजी नगराध्यक्ष बबनराव शिखरे यांच्या अध्यक्षते खाली बैठक संपन्न झाली.
बैठकीमध्ये दि. २० मे २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई येथे सकल मातंग समाजाचा विराट मोर्चा निघणार आहे. या मोर्चा मध्ये महाराष्ट्रातून लाखोंच्या संख्येने मातंग समाज येणार आहेत. हिंगोली जिल्ह्यातून हजारों संख्येने समाजाने उपस्थित राहण्याचा निर्धार करण्यात आला. या बैठकीला सकल मातंग समाजाचे समन्वय तथा लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राधा शेळके यांनी मोर्चा विषयी मार्गदर्शन केले. बैठकीला मोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते. यावेळी प्रा. अंकुश कांबळे, बन्सीलाल भंडारी, महादेव घणघाव, प्रकाश जोगदंड, लक्ष्मण राऊत, चंद्रशेखर लांडगे, विमलताई लांडगे, दिलीप सावळे, दिगबर आगलावे, दशरथ सोनवणे, नामदेव दात्रे, माणिक जोगदंड व मातंग समाजातील पदाधिकारी बैठकीला उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सुक्ष्म सिंचन योजनेत सहा कोटींचा घोटाळा
## ग्रामिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ मार्च**

एका कृषी पर्यवेक्षकाने २०२१-२३ या काळात कंधार, बिलोली, नायगाव या तालुक्यात सूक्ष्म सिंचन योजना या योजनेतंर्गत वितरीत ठिंबक व तुषार संचाची मार्गदर्शक सुचनेनुसार तपासणी न करता शेतकऱ्यांसोबत संगनमत करुन खोटे दस्तावेज करुन तो खरा असल्याचे भासविल्याने व यातून एकूण ५ कोटी ९८ लाखांची फसवणूक करुन अपहार केल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यात काही तत्कालीन अधिकारी व तालुका कृषी अधिकारी असा १४ जणांचा तसेच असंख्य बोगस लाभार्थ्यांचा समावेश आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, कंधार, बिलोली, नायगाव या तालुक्यात ठिंबक व तुषार संचाच्या वाटपासाठी शेतकऱ्यांशी संपर्क साधला व त्यांना ठिंबक व तुषार संचाच्या संदर्भात मार्गदर्शन करुन त्यांना अनुदान देण्याचे आमिष दाखवले. यासंदर्भात जवळपास १४ अधिकाऱ्यांनी यात संगनमत केल्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी सांगितले.

आरोपीमध्ये तत्कालीन कृषी पर्यवेक्षक आर.जे.मरदोडे, कृषी अधिकारी एन.डी.बनसोडे, कृषी पर्यवेक्षक एस.व्ही.दबडे, आर.एम. पाटणकर, तत्कालीन कृषी पर्यवेक्षक जे.डी.पवार, तालुका कृषी अधिकारी एस.एच.कचकलवाड, तत्कालीन कृषी पर्यवेक्षक आर.जे.पवार, आर.पी.जाधव, एम.बी.बैस, आर.जे.चव्हाण, एच.पी.नवारे, ज्ञानेश्वर गुट्टे-ज्ञानेश्वर कृषी सेवा केंद्र मुखेड, वैष्णवी एरिगेशनचे विष्णूकांत मुंढे, सुमीत पाटील एरिगेशनचे संजीव छत्रपती पवळे यांच्यासह काही बोगस लाभार्थ्यांची आरोपीच्या रकान्यात नावे आहेत.

यातील आरोपींनी संबंधित सूक्ष्म सिंचन योजनेच्या खाजगी कंपनी वितरकासोबत संगनमत करुन खोटे दस्तावेज तयार केले. हा प्रकार १ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत चालला. या खोट्या दस्तावेजाच्या माध्यमातून व ते खरे असल्याचे दाखवून शासनाची एकूण पाच कोटी ९८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार कृषी अधीक्षक कार्यालयात उघडकीस आला. याबाबत जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयातील तंत्र अधिकारी स्वामी एस.एस. यांच्या तक्रारीवरुन या सर्व आरोपीविरुध्द ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबतचा तपास पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर हे तपास करीत आहेत. सदरच्या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असून, त्याची सखोल चौकशी करण्यासाठी एक विशेष पथक तयार करण्यात आली आहे. फसवणुकीच्या या गुन्ह्यात काही लाभार्थी शेतकरी व बोगस लाभार्थी यांचीही चौकशी होणार असल्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी सांगितले.

# बॅनरवरून मोटारसायकल नेल्याचा जाब विचारणाऱ्या युवकास मारहाण

**तभा वृतसेवा**
**नायगांव, दि. २७ मार्च**

तालुक्यातील नरसी येथे लग्नाचे बॅनर वरून मोटारसायकल का नेली असा जाब विचारणाऱ्या युवकास मुस्लिम युवकांनी जबर मारहाण केल्याची घटना नरसी येथे घडली आहे. मारहाणीत अर्जुन मेटकर याला गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेतील सहा आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. रामतीर्थचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी तात्काळ अँक्शन घेत यातील पाच आरोपीच्या मुसक्या आवळल्या असून त्यांना न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

नरसी ता. नायगाव येथील मेटकर कुटुंबात दि.२६ रोजी एक लग्न होत या निमित्त येथील चौकाजवळच असलेल्या बजरंग नगर भागातील कॅनॉल रोडवर त्या लग्नाचे बॅनर मेटकर कुटुंबाच्या वतीने लावले जात होते. अर्जुन मेटकर हा सदर बॅनर जमिनीवर ठेवून फिटिंग करत असतानाच तेथून सुसाट जाणाऱ्या मुस्लिम युवकांनी त्या बॅनरवरून मोटार सायकल घातली. अर्जुनने याबाबत त्यांना जाब विचारला. त्यांच्यात यावेळी शाब्दिक बाचाबाची झाली. नंतर विषय थांबला पण रात्री उशिरा त्या युवकांनी पुन्हा इतर काही मुस्लिम युवकांना सोबत घेवून अर्जुन मेटकर याला नरसीच्या मुख्य चौकात गाठले. त्याठिकाणी अर्जुन यास रक्तबंबाळ होईपर्यंत लाठ्या काठ्यांनी तुंबळ मारहाण करण्यात आली. सोबतच्या युवकालाही सोडले नाही. या जबर मारहाणीत अर्जुन मेटकर याच्या चेहऱ्यावर व डोळ्याला गंभीर जखम होवून नाकाचे हाड तुटले. गंभीर अवस्थेत जखमी अर्जुन मेटकर यास उपचारासाठी नांदेड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत रामतीर्थचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी वेगवान कारवाई करत यातील अहेमद शेख, जुनैद बागवान, फुरखान पठाण, लुकमान पठाण, रहेमान शेख व इतर एका अल्पवयीन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तातडीने तपास मोहीम राबवून सपोनि श्रीधर जगताप यांनी या घटनेतील पाच आरोपीना जेरबंद केले असून अहमद शेख हा फरार आहे. अटकेतील पाच जणांना न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी दिल्याची माहिती सपोनि श्रीधर जगताप यांनी दिली आहे.

**रामतीर्थ पोलिसांनी सतर्कता**

रामतीर्थ पोलिसांनी सतर्कता दाखवत वेळीच कठोर पावले उचलल्याने या घटनेतील आरोपी गजाआड झाले असून सपोनि श्रीधर जगताप यांनी समय सूचकता राखून केलेल्या कारवाईमुळे संवेदनशील नरसीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यास मोलाची मदत झाल्याची चर्चा जनतेत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### लोह्यातील ग्लोबलची कु. स्वरा डांगे नवोदय परीक्षेत उत्तीर्ण

**लोहा**-शहरातील साई गोल्डन सिटी परिसरातील ग्लोबल इंग्लिश स्कूलची कु. स्वरा शरदचंद्र डांगे या इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनीने



सन २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या नवोदय परीक्षेत उतिर्न होऊन नवोदय विद्यालय प्रवेशासाठी पात्र ठरली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील नवोदय प्रवेश पूर्व परीक्षेत इयत्ता पाचवी मध्ये शिक्षण घेणारी कु. स्वरा डांगे हिने नवोदय परीक्षेत उतीर्न झाली. तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय मोटे, सचिव डॉ. दीपक मोटे, उपाध्यक्ष दिनेश मोटे ग्लोबल शाळेचे मुख्याध्यापक एन. मनोज कुमार, शिवनंदा पांचाळ, अमोल थावरे, कौशल्य क्षीरसागर, विद्या सकनुरे, कपिल शेट्टे, भारत ढगे, प्रसाद राठोड, विद्या दाभाडे, काशिनाथ पांचाळ, शैलजा देशमाने, संगमेश्वर साकोले, अवंती पारेकर, अनिल बाबर, सुमित्रा फाजगे, स्वप्नाली दिल्लेराव, महेश्वरी केंद्रे, आशा चापोले, पूजा ढगे, ज्योती माकनीकर, ज्योती तरटे, मनीषा विश्वासराव, उषा सूर्यवंशी, मीरा क्षीरसागर आदींनी कौतुक केले.

### शिक्षण, सेवेचा महामेरु: कर्मयोगी बाबासाहेब देशमुख जन्मशताब्दी वर्ष सोहळा

**बिलोली**-समाजाच्या दारिद्र्याचे मूळ हे अज्ञान व आळस तर शिक्षण हाच यावरील उपाय असल्याचे समजून सन १९५९ साली संस्कृति संवर्धन मंडळाची स्थापन करून ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठी



आपले संपूर्ण जीवन समर्पित केलेले कर्मयोगी के.ना.तथा बाबासाहेब देशमुख यांना १०० वर्ष पूर्ण होत असून शनिवार (दि.२९) रोजी सगरोळी (ता.बिलोली) येथे त्यांचा जन्मशताब्दी वर्ष साजरा होत आहे. यावेळी सद्गुरू गुंडा महाराज मठ संस्थानचे प.पू. सद्गुरू चंद्रशेखर महाराज देगलूरकर, माणिकनगर संस्थानचे प.पू. आनंदराज माणिकप्रभू, बेटमोगरा येथील शिवलिंग बादशाह मठाचे प.पू. १०८ सिद्धदयाळ शिवलिंग शिवाचार्य महाराज,खासदार अशोक चव्हाण,खासदार डॉ. अजित गोपछडे,आमदार जितेश अंतापुरकर व विधानपरिषद सदस्य श्रीकांत भारतीय आदींची उपस्थिती राहणार आहे. कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांचे आजोळ पालम (जि.परभणी) असून त्यांचा जन्म पालम येथील असल्याने शुक्रवार दि. २८ मार्च रोजी पालम येथे सकाळी ९ ते १२ दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावेळी पालम ते सगरोळी ज्ञानज्योत निघणार असून दुपारी ३ वाजता नरसी (ता. नायगाव) येथे स्वागत होणार आहे. नरसी ते सगरोळी दरम्यान मोटारसायकल रॅली निघणार असून लोहगाव, कासराळी, बिलोली, कार्लाफाटा आदी ठिकाणी ज्ञानज्योत यात्रेचे स्वागत होणार आहे. सायंकाळी सगरोळी येथे शोभायात्रा निघणार असून बाबासाहेबांच्या समाधी स्थळी रॅलीचे विसर्जन होईल. कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या धोरणानुसार संस्थेने गेल्या सहा दशकांत शिक्षण, कृषि, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण संवर्धन या क्षेत्रांत भरीव कामगिरी केली आहे. हजारो विद्यार्थी, शेतकरी, महिला व लघुउद्योजक यांना संस्थेच्या कार्याचा लाभ मिळत असून, मी सगरोळीत घडलो असे अभिमानाने म्हणणाऱ्या असंख्य व्यक्ती हीच या कार्याची साक्ष देतात. पुढील संपूर्ण वर्ष बाबासाहेबांना अभिप्रेत असलेले सामाजिक उपक्रम राबवून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली जाणर असून जन्मशताब्दी वर्षाचा शुभारंभ शनिवार (दि.२९) रोजी सगरोळी येथे सकाळी ११ वाजता आयोजित केला आहे. या सोहळ्यास नागरिकांनी आवश्य उपस्थित राहावे असे संयोजन समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# बारडच्या उपसरपंच पदासाठी धुसपूस!

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २७ मार्च**

### उपसरपंचपदी नेमकी कोणाची वर्णी लगणार?




बारडच्या उपसरपंच पदासाठी मोठी रस्सीखेच चालू असुन धुसपूस वाढल्याने जो तो मीच उपसरपंच होणार असे म्हणत असताना आता गाव पुढाऱ्यांनी अघोषित तुघलकी फर्मान काढून तंबी दिली असल्याची चर्चा गावभर रंगली आहे. त्यामुळे औक घटकेच्या उपसरपंचपदी नेमकी कुणाची वर्णी लागणार ? हेच आता पाहावे लागेल!

बारड येथील बाळासाहेब देशमुख यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिला असुन आता त्याकरिता अनेकजण इच्छुक असुन कोणाची नाईट वॉचमन पदी वर्णी लागणार याची चर्चा आहे. बारड ग्रामपंचायतचे अनेक सदस्य आपापल्या परीने उपसरपंचपदावर दावा ठोकत आहेत. यात प्रामुख्याने जुन्या फळीतील विलास देशमुख, माणिक लोमटे, इंदू प्रभाकर भिमेवार, नंदा देशमुख यांचे नाव आघाडीवर असून मर्जीतील समजल्या जाणाऱ्या रोहिणी कवळे यांचीही ऐनवेळी वर्णी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर नवीन चेहऱ्यात गजानन कत्रे, प्रदीप देशमुख यांना संधी देऊन अनुभवी फळीला तोंडघशी पाडले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उपसरपंच पदासाठी एकाच गटात अनेकजण इच्छुक असल्याने चुरस वाढल्याने मोठी दुफळी निर्माण होऊन शेवटपर्यंत कोण बाजी मारणार ? याकरिता राजकीय डावपेच आखले जात आहेत.

याच पार्श्वभूमीवर काही ग्रामपंचायत सदस्यांना वगळून समर्थक ग्रामपंचायत सदस्यांची तुघलकी फर्मान काढून तंबी देत खाजगी बैठक घेतल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे क्षुल्लक कालावधीसाठी असलेल्या 'उप'सरपंच पदासाठी निघालेले 'राज'फर्मान लोकशाहीच्या चौकटीत जरी बसणारे नसले तरी ग्रामपंचायत सदस्य मात्र गाव पुढाऱ्याच्या चौकटीचा 'उंबरठा' झिजवत असल्याची चर्चा मात्र गावभर आहे. त्यामुळे अनुभवी फळीतील सदस्य उपसरपंच पदी विराजमान होणार की उंबरठे झिजविणारा विराजमान होणार ? हेच आता पाहावे लागणार आहे.

**एकाधिकारशाही दिसून आल्यास राजकारणाला कलाटणी**

बारडमध्ये उपसरपंच पदाच्या निवडीचे 'राज'कारण जरी शिजत असले तरी त्याचा घास माझ्याच गळी उतरणार असे सर्वांनाच वाटत असताना निवड प्रक्रियेत एकाधिकारशाही दिसून आल्यास गावच्या राजकारणाला भविष्यात मोठ्या कलाटणीची शक्यता नाकारता येत नाही.

# विधीमंडळ उपविधान समितीच्या प्रमुखपदी आ.चिखलीकर यांची नियुक्ती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ मार्च**

विधीमंडळ उपविधानस समितीच्या प्रमुखपदी कंधार-लोहा मतदारसंघाचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांची नियुक्ती विधानसभेच्या अध्यक्षांनी केली आहे. या समितीमध्ये १४ आमदार सदस्यांचा समावेश आहे. तीन टर्मचे आमदार असतानाही चिखलीकर यांची पहिल्यांदाच समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे.



गेल्या दोन टर्ममध्ये आमदार असताना चिखलीकर यांची कोणत्याही समितीच्या प्रमुखपदी वर्णी लागली नव्हती. लोकलेखा समितीच्या सदस्यापदी नियुक्ती झालेली होती. पहिल्यांदाच महत्वाच्या विधीमंडळ उपविधान समितीच्या अध्यक्षपदी प्रतापराव पाटील चिखलीकर यांची निवड झाली आहे. या समितीच्या प्रमुखपदाशिवाय आमदार वेतन व भत्ते समितीच्या सदस्यपदी त्यांची नियुक्ती झाली आहे. या समितीच्या प्रमुखपदी ना.अजितदादा पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उपविधानस समितीच्या प्रमुखपदी आ.प्रतापराव पाटील चिखलीकर तर सदस्यपदी आ.रविशेठ पाटील, आ.सुधीर गाडगीळ, आ.संजय पुराम, आ.किशोर जोरगेवार, आ.जितेश अंतापुरकर, आ.राघवेंद्र पाटील, आ.श्रीमती अनुराधा चव्हाण, राजेंद्र गावित, आ.दिलीप लांडे, आ.राजेंद्र पाटील यड्रावकर, आ.चंद्रकांत नवघरे, आ.सिध्दार्थ खरात, आ.अस्लम शेख या १४ सदस्यांचा समावेश आहे. समिती प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल आ.चिखलीकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# महामंडळाच्या बसेसवर कारवाई तर खाजगी ट्रॅव्हल्स चालकांवर मेहरनजर
## भोकर पोलिसांच्या दुट्टपी भुमीकेमुळे जनतेत संभ्रभ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ मार्च**

वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी उपाय योजना भोकर पोलिस करत असले तरी या कारवाईत मात्र भोकर पोलिसांनी खाजगी प्रवाशी वाहतुक करणाऱ्या वाहनांना सुट दिल्याचे दिसुन येत आहे. भोकर शहरातील डॉ. आंबेडकर चौकात राज्य परिवहनची बस थांबण्यास बंदी घालण्यात आली आहे तर खाजगी प्रवाशी वाहनांना थांबण्याची परवानगी दिली असल्याने भोकर पोलिसांचा हा दुजाभाव का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



भोकर शहरातील डॉ. आंबेडकर चौकात हिमायतनगर, नांदेड उमरी या मार्गावर धावणारी प्रवाशी वाहतुक करणारी वाहने थांबतात. प्रवाशी देखील डॉ. आंबेडकर चौकातुनच प्रवासाची सुरवात करतात परंतू मागील काही दिवसापासून वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी भोकर पोलिस कारवाई करत आहेत. परंतू या कारवाईत मात्र दुजाभाव करण्यात येत आहे. चौकात तासनतास थांबणाऱ्या प्रवाशी वाहतुक करणाऱ्या खाजगी वाहनांवर कारवाई करण्याऐवजी भोकर पोलिस केवळ राज्य परिवहनच्या बसेसवर कारवाई करताना दिसत आहेत. विशेष म्हणजे राज्य परिवहनच्या बसेस या ठिकाणी केवळ अर्ध्या मिनीटांचा थांबा घेतात. परंतू या बसेसना आता दुसऱ्या ठिकाणी थांबा देण्यात आला आहे. यामुळे प्रवाशांची तारांबळ उडत आहे तर दुसरीकडे प्रवाशी वाहतुक करणाऱ्या खाजगी वाहनांच्या रांगा, चौकात रस्त्यावर थाटलेली दुकाने व फेरीवाले यांच्यावर मात्र कारवाई करण्यात येत नाही. प्रवाशी वाहतुक करणाऱ्या खाजगी वाहनांवर देखील कारवाई करण्यात येत नसल्याने या खाजगी वाहतुकीला सुट देण्याचे कारण काय? असा प्रश्न जनता उपस्थित करत आहे. प्रवाशांचा कल आता परिवहनच्या बसेसकडे वाढला असल्याने खाजगी वाहतुकीवर याचा परिणाम झाला आहे. त्यामुळे खाजगी वाहतुकीला तारण्याचा हा भोकर पोलिसांचा प्रयत्न आहे की काय? अशी चर्चा आता होवू लागली आहे.

# अंतेश्वर, धोंड, लिंबोटी धरण बचाव संघर्ष समितीच्या अध्यक्षपदी शरद पाटील पवार

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २७ मार्च**



अंतरेश्वर,धोंड, लिंबोटी धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांची बैठक शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीत शरद पाटील पवार यांची धरण बचाव संघर्ष समितीच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.

लिंबोटी धरणातील पाणी अहमदपूरला वळविल्यमुळे शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला होता. पाण्याचा लढा उभारण्यासाठी अंतेश्वर, धोंड, लिंबोटी धरण बचाव संघर्ष समितीची स्थापना करण्यात येऊन सर्वानुमते अध्यक्षपदी शरद पवार यांची निवड करण्यात आली आहे.या बैठकीस अंतेश्वर, धोंड, लिंबोटी धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

धरण संघर्ष समितीच्या उर्वरित कार्यकारीणीत मार्गदर्शकपदी चंद्रसेन पाटील सुरनर, ॲड. विजय धोंडगे, उपाध्यक्ष दिगांबर पाटील कोरडे, प्रकाश पाटील बाबर, कोषाध्यक्ष माधव पाटील अनकाडे, , सचिव माधवराव यादवे, सहसचिव केशवराव तिडके तर सदस्यपदी अशोक पाटील सोनाळे, संभाजी पाटील कदम, भाऊसाहेब सुरनर, दत्ता पाटील कारामुंगे, केरबा केंद्रे, गुलाब पाटील कदम, बाबासाहेब क्षीरसागरयांची निवड करण्यात आली.

# खाजगी रुग्णालयाच्या मनमानी कारभाराला आवर घाला : रवि राठोड

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २७ मार्च**

उपचारादरम्यान रुग्णांकडून खाजगी रुग्णालय व्यवस्थापनासह रक्ततपासणी ( ब्लड लॅब ) च्या मनमानी शुल्कास आवर घालून दर्शनीभागात दर फलक लावण्यास बंधनकारक करावे अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष रवि राठोड यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकीत्सक नांदेड यांच्याकडे निवेदणाद्वारे केली आहे



जिल्ह्यातील सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या उपचारादरम्यान राजरोजपणे मनमानी शुल्क आकारणी करून रुग्णालय व्यवस्थापन समितीकडून रुग्णांची आर्थिक लूट सुरु आहे.बहुतांश खाजगी रुग्णालयात रुग्णासाठी सोई सुविधा नसून दर्शनीभागावर दरफलक लावलेले नाहीत. रक्त तपासणी प्रयोग शाळेत ( ब्लड लॅब ) उपचारादरम्यान मनमानी सेवाशुल्क आकारणी करून गोरगरिबांची सर्रास आर्थिक लूट केली जात आहे. रुग्णांची खाजगी रुग्णालयाच्या व्यवस्थापन समिती मार्फत सर्व स्तरावरील रुग्णांची होणारी लूट हे अत्यंत मोठ्या प्रमाणात निंदनीय असून नियम व अटी घालून सेवाशुल्क आकारणी करण्यास बंधन घालावे तसेच प्रथम तपासणी पासून ते उपलब्ध सोयी सुविधेनुसार रुग्णालयाच्या व्यवस्थापन समितीकडून आपण घेत असलेल्या उपचार व सोयी सुविधा सेवेची माहिती असणे रुग्णांचे अधिकार आहेत नियम व अटीच्या अधीन राहून सेवाशुल्क आकारणी करण्यास बंधनकारक करावे अशी मागणी रवि राठोड यांनी केली आहे.

# काम करणाऱ्यांना राष्ट्रवादीमध्ये संधी मिळेल : आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ मार्च**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांना प्रत्येक कार्यकर्त्याच्या कामाची जाण आहे . लोकहितासाठी अत्यंत तळमळीने काम करणारे आपले नेतृत्व आहे. त्यामुळे आपण सर्वजण नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला नंबर एकचा पक्ष करण्याच्या अनुषंगाने सुसाट वेगाने कामाला लागा. निश्चितपणे जे काम करतील त्यांनाच संधी मिळेल असा विश्वास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला. आ. चिखलीकर यांच्या साई सुभाष या संपर्क कार्यालयात आज सकाळी राष्ट्रवादी काँग्रेस मधील अनेक पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान



करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास राज्याचे माजी मंत्री तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे , माजी आमदार अविनाश घाटे , जिल्हा अध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी , जिल्हाध्यक्ष रावणगावकर, महानगर अध्यक्ष जीवन घोगरे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव वसंत सुगावे, अशोक मोगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस युवा जिल्हाध्यक्ष बालाजी नागणीकर, युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष मोहसीन खान पठाण, दीपक पावडे, तालुका अध्यक्ष गणेश शिंदे पाटील, रिपब्लिकन पार्टीचे पाहिजे महानगराध्यक्ष धम्मपाल धुताडे, राष्ट्रवादीचे सेवादलाचे जिल्हाध्यक्ष रमेश गांजापुरकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भरभराटीचे दिवस येत आहेत. त्यात आज सुनील नानवटे यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिव पदाची नियुक्तीपत्र देण्यात आले. याचवेळी संतोष नारलावार, यांना उद्योग आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी, सुरेश राठोड यांना ओबीसी विभाग प्रदेश सरचिटणीस पदी , स्वप्नील इंगळे यांची युवक नांदेड उत्तर जिल्हाध्यक्षपदी, कन्हैया कदम यांची युवक प्रदेश उपाध्यक्षपदी, राहुल हंबर्डे यांची युवक प्रदेश सरचिटणीस पदी तर कल्याण सूर्यवंशी यांची ओबीसी सेल प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करून त्यांना नियुक्तीपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला अधिकाधिक मजबूत करण्यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यात अनेक दिग्गज मंडळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहे. माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे , अविनाश घाटे , वेंकटराव पाटील गोजेगावकर, डॉ . मीनल ताई खतगावकर , माजी आमदार ओम प्रकाश पोकर्णा यांच्यासह जिल्ह्यातील अनेक वरिष्ठ श्रेष्ठ नेत्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश होतो आहे . भविष्यातही पक्षप्रवेशाचे सोहळे होतील असा विश्वास आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला.

**पाडव्याच्या मुहूर्तावर राष्ट्रवादीचे सदस्य नोंदणी अभियान**

येत्या पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्य नोंदणीचा शुभारंभ करण्यात येणार आहे .नांदेड जिल्ह्यातील कानाकोपऱ्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची ध्येयधोरणे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा अजेंडा पोहोचविला जाईल . या काळात प्रत्येक गावातून वाडी तांड्यातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्य नोंदणीला प्राधान्य दिले जाईल आणि या सदस्य नोंदणीमध्ये नांदेड जिल्हा हा मराठवाड्यात पहिल्या क्रमांकाचा असेल असा विश्वास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी यावेळी व्यक्त केला.



## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, 'कै. प्रभावतीबाई चंद्रकांतराव यन्नावार' ह्या आमच्या जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, फत्तेजंगपुर, तालुका व जिल्हा नांदेड. या संस्थेचे सभासद असून, नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या क्षेत्रातील संस्थेच्या मालकिची जमिन गट नंबर (१४२) मौजे असर्जन, ता.जि.नांदेड. मध्ये संस्थेच्या लेआऊट प्रमाणे त्यांच्या मालकिचा व ताब्यातील प्लॉट नंबर (६९) एकोणसत्तर आहे. या प्लॉटवर संस्थेच्या प्लॅन प्रमाणे त्यांनी 'डी' टाईप घराचे बांधकाम केलेले आहे. कै. प्रभावतीबाई चंद्रकांतराव यन्नावार यांचे दिनांक १९ ऑक्टोबर २०१७ रोजी निधन झाले असून, त्यांचा वारस मुलगा 'श्री. श्रीनाथ चंद्रकांतराव यन्नावार' यांनी त्यांच्या स्वतःच्या नावावर सदरील प्लॉट नंबर (६९) एकोणसत्तर व त्यावरील बांधकामासह ची हस्तांतरण कार्यवाही करून, प्लॉट हस्तांतरण करून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह, यांनी संस्थेकडे विनंती अर्ज दिलेला आहे.

तरी या सदरील प्लॉट हस्तांतरण कार्यवाहीस कोणाचा आक्षेप असल्यास (७) दिवसाच्या आत अध्यक्ष अथवा सचिव यांच्या कडे मुळ कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. ह्या कालावधीत आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही. असे समजून वरीलप्रमाणे प्लॉट ची हस्तांतरण कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| सचिव | अध्यक्ष |
|---|---|
| जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. फत्तेजंपुर ता.जि.नांदेड | जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. फत्तेजंपुर ता.जि.नांदेड |

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com



बीड : उन्हाळा तप्त झाल्याने झाडे शुष्क होत आहेत. या काळात आकाश निरभ्र असते. त्यात पांगलेले ढग एकत्र आले आणि त्यांनी रंगछटांची उधळण केली तर नयनरम्य नजराणाच ! कृष्णा शिंदे यांनी टिपलेले दृश्य.

# मुलाच्या जन्मदिनी माणुसकीचे दर्शन उपक्रम आयुष अडागळेचा वाढदिवस उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ मार्च**

वाढदिवस म्हंटल की, अमाप खर्च होतो.मात्र या खर्चाला फाटा देऊन पत्रकार बाळासाहेब अडागळे यांनी त्यांचा मुलगा आयुष याचा वाढदीवस अगदी कौतूकास्पद साजरा केला. हा जन्मदिन मुख बधिर विद्यालयातील मुलांना खिचडी व खाऊचे वाटप करुन साजरा केला.त्यामुळे माणुसकीचे मूल्य संवर्धित झाले असून पत्रकार बाळासाहेब अडागळे यांचे कौतूक होत आहे.



माजलगाव शहरातील जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचिलीत मुख बधिर विदयालय आयोजित वाढदिवस कार्यक्रमास माजी सभापती नितीन नाईकनवरे, डॉ. यशवंत राजेभोसले, तलाठी संघटनेचे अध्यक्ष रूपचंद्र आभारे ,संपादक प्रचंड सोळंके, संपादक परमेश्वर सोळंके, अमर साळवे, शेख सलीम, अभिनेत्री प्राची सोनवणे, पत्रकार दत्ता येवले, गायक सौरभ सिरसाट, लेखक केतन हातागळे, हरिभाऊ गवते, सुनिल डोंगरे, रविकांत राठोड, अनिल खंडागळे, नारायण राठोड, प्रचंड सोळंके, मुख्याध्यापक मुख्याध्यापक थळपती, ए.एम. पाटील प्रकाश, आगे प्रकाश उत्तम आगे, पाटील उत्तम, जगन्नाथ आगे, विठ्ठल जाधव, सुनील पवार, विठ्ठल खंडगावे, उद्धव कोरडे,आदी उपस्थित होते.

यावेळी आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी प्रत्येकानी आपल्या वाढदिवसाचा व्यर्थ खर्च गोरगरीब मुलांसाठी खर्च करावा, महाराष्ट्राची आदर्श संस्कृती दाखून द्यावी असे मत सर्व प्रमुख पाहुण्यानी व्यक्त केले. यावेळी आश्रमातील विद्यार्थ्यांना खिचडी व गोड जेवण देण्यात आले. यावेळी बहूसंख्ये विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संकेत गायकवाड, रंजीत आडागळे, संतोष घट्टे यांच्यासह आदीं परिश्रम घेतला.

# माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमात नागनाथ विद्यालय प्रथम तर पिंपळवाडी विद्यालय द्वितीय

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२७ मार्च**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा २०२४-२५ या अभियानांतर्गत बीड तालुक्यात गुणानुक्रमाणे प्रथम मोरगाव येथील नागनाथ विद्यालय तर पिंपळवाडी विद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवला आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा २०२४-२५ या अभियानांतर्गत मोरगाव येथील नागनाथ विद्यालयाचा प्रथम क्रमांक आला तर पिंपळवाडी विद्यालय, पिंपळवाडी या शाळेचा द्वितीय क्रमांक आला आहे. त्याबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी राजा मचाले, कार्यवाहक एम.ए.राऊत, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दत्तात्रय माटे, पिंपळवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदिप जगताप, ग्रामस्थ मंडळी आणि शाळेच्या कर्मचार्यांनी अभिनंदन केले.

# बोबाटी नदी संवाद परिक्रमा आज विडा ग्रामपंचायतपासून

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ मार्च**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचा उमक्रम असलेल्या चला जाणूया नदीला या उपक्रमांतर्गत उद्या शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ रोजी बोबाटी नदी संवाद परिक्रमा चे उद्घाटन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते होत आहे.

राज्यातील नद्या अमृतवाहिनी करण्याचा संकल्प या उपक्रमात करण्यात आला आहे. यात उद्या केज तालुक्यातील विडा ग्रामपंचायत येथे सकाळी ९.३० वाजता हे उद्घाटन होईल. यावेळी या अभियानाचे राज्यस्तर सदस्य अनिकेत लोहिया, अभियानाचे सचिव विभागीय वनाधिकारी ए.बी. गर्कळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

ही ✻नदी पुनरुज्जीवन, जनजागृती व नदीच्या समस्या अभ्यासण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या यात्रेत ✻✻नदी क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व शासन अधिकारी✻ मार्गदर्शन करणार आहेत. या संवाद यात्रेसाठी इंडिया वॉटर पार्टनरशिप व सर्वज्ञ करिअर अकॅडमी केज इतर भागीदारी संस्थेचे सहकार्य लाभत आहे.

प्रमुख उद्दिष्टे:

नदी साक्षरता वाढवणे व जनजागृती करणे

नदीचे आरोग्य, जैवविविधता आणि भूजलस्तर सुधारण्यासाठी उपाययोजना ठरवणे

नदीच्या अतिक्रमण, शोषण आणि प्रदूषणावर नियंत्रणासाठी उपाय शोधणे

यात्रेच्या दरम्यान ✻नदी पुनरुज्जीवनावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच कला पथकाद्वारे सांस्कृतिक व जनजागृतीपर कार्यक्रम✻ होणार आहेत. विडा, पिंपळगाव, सारणी सांगावी, सिंधी, काळेगाव, अरणगाव, जाधव जवळा, मस्साजोग, उत्तरेश्वर पिंपरी, कापरेवाडी, केवड, बेळगाव, सारुखवाडी, डोका, हदगाव, वरपगाव येथील ✻शेतकरी, ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, युवक मंडळे, शासकीय अधिकारी व सामाजिक संस्था✻ यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन युवा ग्राम विकास मंडळ संस्थेचे एचपी देशमुख व संतोष रेपे यांनी केले.

# श्री सिद्धेश्वर च्या कैलासची नाथसृष्टीत लक्षवेधी कला साधना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ मार्च**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध संस्थान, मराठवाडाचे श्रद्धास्थान पैठण नाथ मंदिरातील परिसरात नाथ महाराजांच्या जीवनावर आधारित विविध प्रसंग शिल्पामधून साकारण्यात आलेले आहेत. हे शिल्पकृतीचे काम राहुल चक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली, बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील श्री सिद्धेश्वर विद्यालयाचा माझी विद्यार्थी शिल्पकारकैलास आडे यांची कला साधना पहायला मिळते आहे.




नुकतीच नाथषष्ठीच्या निमित्ताने लाखो भाविकांनी पैठण नगरीत हजेरी लावली, याच प्रसंगी या शिल्पकलासृष्टीचेही उद्घाटन खा संदिपान भुमरे आणि विलास भुमरे यांच्या प्रयत्नातून सुरू असलेल्या विकास कामातील वाट्यातून संपन्न झाले आहे, ही शिल्पकलासृष्टी पैठणच्या नाथ सृष्टीमध्ये मोठी लक्षवेधी ठरलेली आहे.

कीर्तनात तल्लीन झालेले नाथ महाराज, ज्ञानेश्वर माऊलीच्या समाधीचे शोध, जनार्दन स्वामींची भेट, प्राकर्तातील भागवत गंगा मातेने रक्षीले, श्रीखंडया द्वारकाधीशाचे दर्शन, कृष्णकमळ तीर्थावर जलसमाधी, विजयी पांडुरंगाला लोणी खाऊ घालताना अशा विविध प्रसंगातून ही शिल्पशष्टी नटलेली दिसून येते आहे. या शिल्पकला साधने घरोघरी संत विचार आणि शिल्प दर्शन पोहोचण्यासाठी चे कार्य कैलास आडे मोठ्या जिद्दीने आणि कष्टाने करत असल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत असताना पाठबळही तितकेच महत्त्वाचे आहे.

# किल्लेधारुर तहसील कार्यालयात निराधार योजनेच्या लाभासाठी गेलेल्या ७० वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू

## डीबीटी फॉर्म भरण्यासाठी गेल्या होत्या कमलबाई कसबे

## सतत अपमानित होणाऱ्या निराधार लाभार्थ्यांचा जीव धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२७ मार्च**

गेल्या काही महिन्यांपासून बंद पडलेली निराधार योजनेची पगार सुरु करण्यासाठी शहरातील आणि तालुक्यातील तहसील कार्यालयात डीबीटी फॉर्म भरण्यासाठी आलेल्या सत्तर वर्षीय वृद्ध महिलेचा तहसील कार्यालयात मृत्यू झाल्याची घटना आज दि. २७ मार्च गुरुवार रोजी घडली.

कमलबाई बाबुराव कसबे (वय वर्षे ७० रा. मोहा जहागीर) या तहसील कार्यालयात डीबीटी करण्यासाठी गेल्या होत्या. त्यांना तहसील कार्यालयातच उष्माघाताचा झटका आल्याची प्राथमिक माहिती मिळाली. उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात नेत असतानाच मृत्यूने त्यांना गाठले. तहसील कार्यालयाच्या गलथान कारभारामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना, श्रावणबाळ योजना आदींचे अनुदान रखडले आहे. ठराविक लाभार्थ्यांचे अनुदान मिळत असल्याने लाभापासून वंचित असलेले शेकडो वृद्ध, निराधार, अपंग लोक पुन्हा पुन्हा डीबीटी करण्यासाठी तहसील कार्यालयात येरझऱ्या मारत आहेत. सतत अपमानित होणाऱ्या निराधार लाभार्थ्यांचे आता जीव सुद्धा जात असल्याचे आजच्या घटनेवरून दिसून आले. या घटनेनंतर दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर काय कारवाई करण्यात येते याकडे लक्ष.



# रोजगार क्षमता विकास कार्य शाळेचे स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ मार्च**



येथील कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी तंत्र निकेतन महाविद्यालय व स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल व इंटरप्रिटेशनशिप डेव्हलपमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने सहा दिवसीय रोजगार क्षमता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले . या कार्यशाळेचे उद्घाटन पुणे येथील मेडिकल इलेक्ट्रॉनिक विषयातील तज्ज्ञ आकाश बाबासाहेब मिसाळ यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपले नियमित शिक्षण घेताना रोजगाराच्या संधी शोधल्या पाहिजेत असे मत व्यक्त केले. स्वयंरोजगार, नौकरी मिळविण्यासाठी विशिष्ट प्रकारची क्षमता विकसित केली तर संधी चालून येतील असे मत आकाश मिसाळ यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या संबोधनाने झाला. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या क्षमतांचा विकास केला गेला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थी ज्ञानार्जनाने परिपूर्ण झाला त्याच्या क्षमतांचा विकास झाला तर प्रगतीची अनेक द्वारे खुली होतील असे मत चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेच्या उद्घाटनाच्या सत्रात महाराष्ट्र उदयगिरी महा विद्यालयातील आय . क्यू. ए. सी. विभागाचे प्रमुख डॉ. कमलाकर गव्हाणे यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. आकांक्षा भांजी तसेच डॉ. नितीन डोके दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर.प्रा. डॉ. संजय साळुंके लो. टिळक महाविद्यालय, वडवणी यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे यशस्वीपणे आयोजन करण्यांत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.आर. थारकर, उपप्राचार्य डॉ. रमेश सोनटक्के ,इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.धनाजी आर्य, वाणिज्य विभागातील सहयोगी प्राध्यापिका डॉ. ममता राठी तसेच कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी तंत्र निकेतनचे प्राचार्य डॉ. रमण देशपांडे यांनी महत्वाचे योगदान दिले. प्रशिक्षक विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.संदीप क्षीरसागर महाराष्ट्र विधीमंडळ समितीवर पंचायतराज समितीवर झाली निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ मार्च**

बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांची महाराष्ट्र विधीमंडळाच्या पंचायतराज या महत्त्वपूर्ण समितीवर निवड झाली आहे. गुरूवारी (दि.२७) रोजी विधीमंडळ सचिवालयाकडून ही निवड जाहीर करण्यात आली असून, त्यांच्या या नव्या जबाबदारीबद्दल राजकीय वर्तुळातून कौतुक होत आहे.



आ. संदीप क्षीरसागर हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार असून, बीड जिल्ह्यातील जनतेच्या प्रश्नांना विधानसभेत प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी ते ओळखले जातात. आमदार होण्याअगोदर आ.संदीप क्षीरसागर यांनी पाच वर्षे पंचायत समिती सभापती, अडीच वर्षे जिल्हा परिषद सदस्य व पाच वर्षे जिल्हा परिषद सभापती असे एकूण साडेबारा वर्षे पंचायत राज व्यवस्थेमध्ये प्रत्यक्ष काम केले आहे. त्यामुळे पंचायत राज व्यवस्थेचा त्यांना सखोल अभ्यास आहे. आता पंयायतराज समितीवर त्यांची निवड झाल्याने त्यांना विधीमंडळाच्या कामकाजातही अधिक सक्रिय सहभाग घेता येणार आहे. ही समिती राज्यातील पंचायत राज विभागाच्या महत्त्वाच्या धोरणांवर देखरेख ठेवून सरकारला शिफारशी करण्याचे काम करते. आ. क्षीरसागर यांनी यापूर्वी विधानसभेत अनेकदा बीड जिल्ह्यातील पाणीटंचाई, ग्रामीण विकास आणि सामाजिक प्रश्नांवर भाष्य केले आहे. त्यांच्या या नव्या भूमिकेमुळे त्यांना समितीच्या माध्यमातून राज्यस्तरीय धोरणांवर प्रभाव टाकण्याची संधी मिळणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे समर्थक आणि पक्ष कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी- आ.संदीप क्षीरसागर

विधीमंडळाच्या पंचायत राज समितीमध्ये निवड ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. मी माझ्या मतदारसंघातील आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जनतेच्या हितासाठी पंचायत राज समितीच्या माध्यमातून काम करेन. बीड जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी आणि जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असे, निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना आ. क्षीरसागर यांनी म्हटले.

# डॉ.आंबेडकर नगर साठे नगर पाटिल गल्ली संयुक्त जयंती समितीच्या अध्यक्षपदी गोविंद टाकणखार



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ मार्च**

डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर माजलगाव येथे दिनांक २४ रोजी भीम जयंती साजरी करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते दयानंद स्वामी होते.

या बैठकीत सर्वानुमते जयंती समितीच्या पदाधीकाऱ्यांच्या एकमताने निवडी करण्यात आल्या असून अध्यक्षपदी गोविंद टाकणखार उपाध्यक्षपदी संतोष टाकणखार कोषाध्यक्ष निशिकांत टाकणखार , जयपाल भिसे सचिव बाळकृष्ण शिनगारे चिंतामणी भिसे मिरवणूक प्रमुख विक्की साळवे बजरंग शिंदे गौतम जावळे विजय साळवे आकाश टाकणखार राजाभाऊ टाकणखार प्रकाश तोडके राजपाल टाकणखार दीपक टाकणखार नामदेव शिंदे किशोर टाकणखर वशिष्ठ टाकणखार बंटी स्वामी बबलू टाकणखार संजोग कसबे शीलवंत जावळे सुमित साळवे परमेश्वर शिनगारे हिरामण जावळे करण टाकणखार आबासाहेब भिसे प्रेम भिसे सौरव अविनाश लोखंडे कांबळे दगडू भिसे विश्वजीत भिसे सुनील भिसे अमिताभ आलझेंडे आशिष आल झेंडे हनुमान भिसे संजय भिसे युवराज भिसे तुकाराम आरे चंद्रमणी भिसे अविनाश आवचार अनिल लोखंडे गोटू भिसे यांची निवड करण्यात आली आहे. प्रसंगी यूवा नेते अभय होके पाटील , तालेब चाऊस, रोहन घाडगे ईश्वर होके नारायणराव होके पाटील भारतराव होके पाटिल दत्ता महाजन शुभम डाके मोहसीन बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.